रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक २९ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ५ जुलै २०२४

किंमत ४ ₹

## सोरेन यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

**रांची :** झारखंड मुक्ती मोर्चाचे (जेएमएम) कार्याध्यक्ष हेमंत सोरेन यांनी गुरुवारी सायंकाळी येथील राजभवनात झारखंडचे १३ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी राजभवनात हेमंत सोरेन यांना मुख्यमंत्रिपद आणि गोपनीयतेची शपथ दिली.चंपाई सोरेन यांनी बुधवारी राज्यपालांकडे आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला होता. त्याचवेळी हेमंत सोरेन यांनी सरकार स्थापनेचा दावा केला. तत्पूर्वी झालेल्या बैठकीत उपस्थित आघाडीच्या सर्व आमदारांनी एकमताने हेमंत सोरेन यांची नेतेपदी निवड केली होती. यानंतर राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी हेमंत सोरेन यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले आहे.




# आमदारांना हवं फुकटचं श्रेय

## जिल्हा रुग्णालयाच्या निधीबाबत आ. दळवींचा खोटारडेपणा उघड

## आ. जयंत पाटील यांच्या पाठपुराव्यानेच कामाला सुरुवात

**रायगड :** शेकापचे आ. जयंत पाटील यांनी अधिवेशनात एखादा प्रश्न मांडला आणि तो सरकारने सोडवला नाही, असे कधीच झाले नाही. त्याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयाची इमारत पाडून त्या ठिकाणी आता सात मजल्यांची सुसज्ज इमारत उभारण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. यासाठी तब्बल १५० कोटी ६८ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. मात्र याचे श्रेय लाटण्यासाठी स्थानिक आमदार आणि त्यांचे समर्थक चांगलेच हापापले आहेत. त्यांच्याकडून आपणच काम केल्याची शेखी समाजमाध्यमांवर मिरवण्यात येत आहे. परंतु जनता सुज्ञ असून अलिबाग आणि पर्यायाने रायगडच्या जनतेचा विकास करण्याची धमक फक्त शेकापमध्येच आहे, हे पुन्हा एकदा आमदार जयंत पाटील यांनी सिध्द केले आहे.



नेहमीप्रमाणे चांगले काम झाले कि ते आम्ही केले असा आव स्थानिक आमदार आणि त्यांच्या समर्थकांनी आणण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक आमदार आणि समर्थकांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत आमच्या प्रयत्नाने नव्याने उभी राहत असल्याचे खोटे श्रेय लाटण्याचा प्रयत्न समाज माध्यमांवर सुरु केला आहे. प्रत्यक्षात मात्र शेतकरी कामगार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी गतवर्षीच्या पावसाळी अधिवेशनामध्ये सभागृहात जिल्हा सामान्य रुग्णालय नव्याने बांधण्याबाबतची मागणी सभागृहासमोर केली होती. आमदार जयंत पाटील यांनी केलेली मागणी आणि पाठपुराव्यामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयाची सात माजली इमारत उभारण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे.

अलिबागमधील जिल्हा रुग्णालयाची इमारत जीर्ण झाली आहे. तरीही देखभाल, दुरुस्तीच्या नावाखाली

पान २ वर

### काय म्हणाले होते आ.पाटील

आतापर्यंत या इमारतीच्या देखभाल, दुरुस्तीसाठी कोट्यवधींचा खर्च करण्यात आलेला आहे. त्या खर्चात किमान तीन रुग्णालयांची उभारणी करता आली. असती, असे त्यांनी निदर्शनास आणले. यावर्षीही १३ कोटींचा निधी देखभाल, दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आलेले आहेत. ज्या ठिकाणी ही वास्तू आहे, तो परिसर इको झोन म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. नवीन इमारत बांधल्यास परिसरातील दोन मैदानांना धोका निर्माण होणार आहे. शिवाय या परिसरातच बांधकाम विभागाचे कार्यालय आहे. त्यांनाही अडचण निर्माण होणार आहे. यासाठी सरकारने कृषी विभागाच्या जागेत हे रुग्णालय उभारले तर चांगली इमारत उभी राहिल आणि रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळतील, अशी अपेक्षाही गतवर्षीच्या पावसाळी अधिवेशनात १८ जुलै २०२३ रोजी व्यक्त केली होती.

# खारभूमी योजनांची कामे मार्गी लावा

## आ. जयंत पाटील यांची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**


रायगड जिल्ह्यासह अलिबाग तालुक्यातील अनेक खारभूमी योजनेची कामे अपूर्ण अवस्थेत आहेत .त्याचा परिणाम येथील भात पिकांसह शेतकऱ्यांवर व गावांच्या विकासावर होत असल्याची बाब आ. जयंत पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच खारभूमी योजनांचे प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्यात यावी. अशी मागणी आ. जयंत पाटील यांनी केली. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कामे प्रलंबित असल्याचे कबूल करत उर्वरित कामे जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले.

रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांमध्ये खारभूमीच्या एकूण १५६ योजना राबविल्या जात असून यामध्ये २२ हजार ७४९ हेक्टर क्षेत्र समुद्राच्या पाण्यापासून संरक्षित होणे आवश्यक होते. तसे न झाल्याने अलिबाग तालुक्यातील बहिरीचा पाडा, मानकुळे, धेरड, शहापूर आदी गावे समुद्र गिळंकृत करण्याची भीती निर्माण झाली आहे.

पान २ वर

### २०२५ अखेर काम होणार पूर्ण

मानकुळे –सोनकाठा–हाशिवरे खारभूमी योजनेच्या नूतनीकरणाचे कार्यारंभ आदेश फेब्रुवारी २०२० मध्ये देण्यात आले आहेत. या योजनेच्या एकूण ८६७० मीटर लांबीपैकी ३७३० मीटर लांबीचे बांधाचे मातीकाम पूर्ण झाले आहे. त्यासाठी मार्च २०२४ अखेर पर्यंत ७७८.४४ लक्ष इतका खर्च झाला आहे. उर्वरित चार हजार ९४० मीटर लांबीच्या बंधाऱ्याचे व आवश्यक पाच उघड्यांचे काम जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले असल्याचे फडणवीस यांनी सांगितले .



### आजचा अग्रलेख

**असंगांशी सत्संग**

### वे|ध|क

## मनोज जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षण लढ्याचं नेतृत्व सांभाळणारे मनोज जरांगे पाटील यांच्या सुरक्षेमध्ये वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मंत्री शंभुराज देसाई यांनी याबाबत माहिती दिली. काही दिवसांपूर्वी अंतरवाली सराटी गावात रात्रीच्या वेळी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे टेहळणी झाली होती. मनोज जरांगे पाटील यांचं घर आणि उपोषणस्थळाच्या भोवती ड्रोन कॅमेऱ्याने पाळत ठेवल्याचा संशय होता. मराठा समाजाने आक्रमक होत मनोज जरांगेंना झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी केली होती.

पान २ वर

## वसंत मोरेंचा वंचितला ‘जय महाराष्ट्र’

**पुणे :** पुण्यातले मनसेचे माजी नेते वसंत मोरे येत्या ९ तारखेला ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. त्याबद्दल गुरूवारी मोरेंनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतली. उद्धव ठाकरेंच्या भेटीनंतर वसंत मोरेंनी आगामी विधानसभा लढवण्याचे संकेत दिले आहेत. पुण्यातील दोन मतदारसंघावर त्यांनी दावा ठोकला आहे. मोरे यांनी पुणे लोकसभा निवडणूक वंचितकडून लढवली होती. मात्र त्यांना पराभव पत्करावा लागला. आता पुढील राजकीय वाटचाल मोरे हे ठाकरे गटातून पार पाडणार आहेत. वसंत मोरे म्हणाले, विधानसभा निवडणुकीसाठी मला दोन पर्याय आहेत. आगामी निवडणूक खडकवासला आणि हडपसर, दोन्हीकडून लढू

पान २ वर

# महाडमध्ये रुग्णालयासाठी १४८ कोटींची मान्यता

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यासह लगतच्या गावे-पाड्यांतील रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळावी तसेच अपघातग्रतांनाही तत्काळ उपचार मिळावेत, या दृष्टीने महाड जवळील केंबुर्ली येथे २०० खाटांचे भव्य सुसज्ज रुग्णालय उभारण्यात येणार आहे. रुग्णालयाच्या मुख्य इमारतीच्या बांधकामासाठी व आराखड्यासाठी राज्य सरकारने सुमारे १४८ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे.

महाड व पोलादपूर तालुके हे दरडग्रस्त तालुके आहेत. या तालुक्यात वारंवार नैसर्गिक आपत्ती घडतात. महाड येथे औद्योगिक वसाहत आहे तर कोकण रेल्वेचे तसेच घाटमार्गाचे व महामार्गाचे मोठे वाहतूक जाळे आहे. यामुळे येथे अद्ययावत रुग्णालयाची गरज निर्माण झाली होती. महाड तालुक्यात सध्या उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधांवर मंडणगड, दापोली, श्रीवर्धन, म्हसळा हे तालुके अवलंबून आहेत. परंतु त्या तुलनेत आरोग्य सुविधा नाहीत. सद्यःस्थितीत या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर असले तरी तेथे कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने मुंबई-पुणे गाठावे लागते.

महाड शहरानजिक मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या केंबुर्ली येथील ४२ हेक्टर सरकारी जागेत २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभे राहणार आहे. याकरिता राज्य सरकारने इमारत बांधकाम अंदाजपत्रक व आराखड्यास १४७ कोटी ७० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. हे रुग्णालय उभे राहिल्यानंतर महाडकरांना मोठ्या आजारांवरील उपचार व शस्त्रक्रियांसाठी मुंबई-पुण्यात जाण्याची गरज उरणार नाही. तर अपघातातील गंभीर जखमींनाही तात्काळ उपचार मिळणार असून मृत्यूचे प्रमाण कमी होणार आहे.




जल्लोष, उत्साह अन् विश्वविजेत्यांचे स्वागत...

# निवृत्त सदस्यांची कामगिरी प्रेरणादायी- मुख्यमंत्री

**। मुंबई । दिलीप जाधव ।**

महाराष्ट्राचे विधान परिषद सभागृह हे खऱ्या अर्थाने वरिष्ठ सभागृह आहे. त्याचा नावलौकीक उंचावणारी कामगिरी आज निवृत्त होणाऱ्या सदस्यांनी केली आहे. या कामगिरीची दखल विधिमंडळाच्या कामकाजाच्या रुपाने इतिहास म्हणून नोंदवली गेली आहे. येणाऱ्या पिढ्यांना या मंडळीचे काम या कामकाजाच्या नोंदीवरून अभ्यासता येईल. त्यातून प्रेरणा घेता येईल, असे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. विधान परिषदेतून निवृत्त होणाऱ्या सदस्यांना बुधवारी (दि.४) निरोप देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.



विधानपरिषदेतील शेकापक्षाचे ज्येष्ठ आ. जयंत पाटील यांच्यासह विलास पोतनीस, निरंजन डावखरे, किशोर दराडे, कपिल पाटील, ॲड. अनिल परब, महादेव जानकर, डॉ. मनिषा कायंदे, विजय ऊर्फ भाई गिरकर, बाबाजानी दुर्राणी, निलय नाईक, रमेश पाटील, रामराव पाटील, डॉ. मिर्झा वजाहत, डॉ. प्रज्ञा सातव, जयंत पाटील या सदस्यांना निरोप देण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्राचे हे वरिष्ठ सभागृह वैशिष्ट्यपूर्ण असून देशात सहा

पान २ वर

# हिरा निवास बिल्डींगच्या दुसऱ्या मजल्यावर आग

## लाखो रुपयांचे नुकसान; सुदैवाने जीवित हानी टळली

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड-एकदरा ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदर येथील हिरा निवास बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावर पहाटेच्या दरम्यान आग लागुन लाखो रुपयांचे नुकसान झाले.



एकदरा-खोरा बंदरजवळील परिसरात राहणारे मनोज सतविडकर व बंड्या सतविडकर यांना सकाळी उठल्यावर बाजुला असणाऱ्या हिरा निवास बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावरुन धूर व आग दिसली. त्यांनी ओरडा-ओरड केल्यानंतर बिल्डिंगच्या बाजुला असणाऱ्या घरातील अजय शिंदे व त्यांचे कुटुंबिय बाहेर पडले. त्यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न केला परंतु आग भडकत गेल्याने स्वतः दुचाकीवरून मुरूड-जंजिरा नगरपरिषद कार्यालयात जाऊन अग्निशमन दलाच्या जवानांना आगी संदर्भात माहिती दिली.

अग्निशमन दलाचे जवान राकेश पाटील, शुभम करडे, अभिजित कारभारी, नितेश माळी, अविनाश अवघडे,

पान २ वर

# अंबादास दानवेंना निलंबनातून सूट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवसेना नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं विधान परिषदेतून निलंबन करण्यात आलेलं होतं. त्यानंतर त्यांनी पत्र लिहून निलंबनाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी सभापतींकडे केली होती. सभापतींनी अंबादास दानवेंच्या निलंबनावर सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना निलंबनातून सूट देण्यात आली आहे. पाच दिवसांऐवजी केवळ तीन दिवसांच्या निलंबनाची कारवाई दानवेंवर करण्यात आली आहे. त्यामुळे आता दानवे शुक्रवारपासून विधीमंडळाच्या कामकाजात सहभाग घेतील.



अंबादास दानवे यांनी सभागृहात भाजप नेते प्रसाद लाड यांना शिवीगाळ केली होती. दानवेंनी असभ्य भाषेचा वापर केला होता. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी प्रसाद लाड यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी केली होती. त्यानंतर त्यांना पाच दिवसांसाठी निलंबित करण्याचा निर्णय उपसभापतींनी घेतला होता. दरम्यान, अंबादास दानवे यांचे निलंबन मागे घेण्यात यावे,यासाठी सलग दोन वेळा उपसभापती यांच्या दालनात बैठका पार पडल्या. एवढंच नाही तर स्वतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीला उपस्थिती लावली

पान २ वर

# विद्यार्थ्यांसाठी तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्या

- तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांचा समावेश
- १० ते १२ जुलै दरम्यान होणार परीक्षा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील तिसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्या घेतल्या जाणार आहेत. त्यात पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी १ आणि संकलित मूल्यमापन चाचणी २ अशा चाचण्यांचा समावेश असून, पायाभूत चाचणी १० ते १२ जुलै या कालावधीत होणार आहे.

पायाभूत चाचणीचे गुण विद्या समीक्षा केंद्र येथे नोंदवण्यात येणार आहेत. त्यासाठी शिक्षकांनी चाचण्या तपासून त्याचे गुण विद्या समीक्षा केंद्रामार्फत उपलब्ध होणाऱ्या संकेतस्थळावर नोंदवायचे



आहेत. त्यासाठीच्या सूचना स्वतंत्रपणे दिल्या जाणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी परिपत्रकाद्वारे या बाबतचे निर्देश दिले. पायाभूत चाचणी एकूण दहा माध्यमांमध्ये घेतली जाणार आहे. त्यात तिसरी ते नववीच्या प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा इंग्रजी या विषयांची लेखी आणि तोंडी

पान २ वर

### आमदार जयंत पाटील यांची खंत

# मुंबई सुंदर करताना जुळी मुंबई भकास करु नका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**देशाची आर्थिक राजधानी असणारी मायानगरी मुंबईत १० लाख झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्याचे शासन ठरवित आहे. मुंबई अधिक सुंदर होईलही मात्र मुंबईतल्या महानगर पालिकेच्या तोडीची रायगड जिल्ह्यात ‘अ’ वर्गाची खोपोली नगरपालिका आहे. या नगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना मुंबईसारखा एसआरए योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. नाहीतर सरकार मुंबई सुंदर करेल आणि जुळी मुंबई मात्र भकास होईल, अशी खंत शेतकरी कामगार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी सभागृहात बोलून दाखवली.**

विधानपरिषदेच्या सभागृहात झोपडपट्टी पुनर्वसन आणि एसआरए योजनेच्या लाभाबाबतीत तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या प्रश्नावर सरकाराला विरोधी बाकावर बसणाऱ्या आमदारांनी घेरले. महानगर पालिकाआणि नगरपालिका हद्दीत असणाऱ्या सर्वच झोपडपट्टी परिसराचा कायापालट झाला, पाहिजे यावर सभागृहातील आमदारांनी आपली मते नोंदवली. मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीमधील घरे विक्रीची प्रक्रिया सुलभ होण्याकरिता व सदनिका विकण्यासाठी महसूल प्रशासनाकडून घालण्यात आलेली जाचक अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली, असे प्रश्न सदस्यांनी उपस्थित केले होते. उपस्थित झालेल्या तारांकित प्रश्नावर आपले मत मांडताना आमदार जयंत पाटील यांनी वाढते नागरीकरण आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतचे आपले परखड मत व्यक्त केले.



आ. जयंत पाटील म्हणाले कि, मुंबई महानगर पालिकेच्या परिसरात असणाऱ्या झोपडपट्टी परिसराचा पुनर्वसनाचा प्रस्ताव मार्गी लागून मुंबई सुंदर करण्याचा सरकराचा प्रयत्न आहे. मुंबई सुंदर करताना केवळ मुंबईपुरतेच विचार न करता मुंबई शेजारील रायगड जिल्ह्यात असणाऱ्या नगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसनाचादेखील विचार करायला हवा. रायगड जिल्ह्यात असणाऱ्या खोपोली नगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टीने नगरपालिका हद्दीत असणाऱ्या झोपडपट्टी परिसराचे पुनर्वसन करण्यावर देखील शासनाने लक्ष केंद्रित करावे, अन्यथा मुंबई सुंदर करताना जुळी मुंबई भकास होईल, अशी खंत व्यक्त करीत आ. जयंत पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

आ. जयंत पाटील यांनी उपस्थित केलेल्या मागणीवर उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एसआरए योजनेतुन बांधण्यात येणाऱ्या घराची विक्री करून झोपडीधारकांना मोफत घरे दिली जातात. मुंबईतील जागेचा भाव जास्त असल्यामुळे ते शक्य होते. मात्र इतर महानगर पालिका हद्दीत येणाऱ्या झोपडीधारकाना मोफत देणे शक्य असल्यास एसआरए योजना तपासून त्याची अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन यावेळी उपमुख्यमंत्री

पान २ वर

# सगेसोयरेच्या याचिकेत तथ्य नाही

## राज्य सरकारचा कोर्टात युक्तिवाद

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करावी, अशी मागणी मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करु नये, यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली.

मराठा समाजातील सगेसोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊ नका, या मागणीसह दाखल केलेल्या याचिकेत तथ्य नाही, त्या याचिका फेटाळून लावण्यात याव्यात, अशी मागणी राज्य सरकारने हायकोर्टात केली आहे.

ओबीसी संघटना आणि मंगेश ससाणे यांनी यांच्यासह इतर याचिकाकर्त्यांना यावर उत्तर सादर करण्याचे निर्देश देत हायकोर्टाकडून सुनावणी दोन आठवड्यांकरता तहकूब करण्यात आली.

मराठ्यांना दिलेलं कुणबी प्रमाणपत्र स्थगित करा, अशी याचिकेतील प्रमुख मागणी आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत राज्य सरकारनं २६ जानेवारी २०२४ रोजी अधिसूचना जारी केली आहे. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत या अधिसुचनेद्वारे लोकांच्या हरकती व सूचना मागवण्यात आल्या होत्या, १६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण झाली. या अधिसचूनेत मराठ्यांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र अशा प्रकारे कुणबी प्रमाणपत्र वितरित करण्यात येऊ नयेत, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आलेली आहे.

# कर्जमुक्ती करुन सातबारा कोरा करा

। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।

सरकारनं शेतकऱ्याला कर्जमुक्ती करुन त्याचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. या मागणीसाठी सर्व शेतकरी थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहणार आहेत. यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं पुढाकार घेतला आहे. सरकारचं धोरण, डिझेल, खते किटकनाशके यांचा खर्च वाढत चालला आहे. यामुळं शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढत असल्याचे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे.

बाहेरच्या देशातून सोयाबीन पेंड व पामतेल आयात केल्याने सोयाबीनचे दर पडले. सोयाबीन उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला. दूध पावडर आयात केल्याने दुधाचे भाव कमी झाले आहेत. सरकारने मका आयात करु लागल्याने मक्याचे दर ढासळले आहेत. यामुळं मका उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. साखर निर्यातीवर बंदी घातल्याने प्रति टनास ८०० रुपयाचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा तोटा झाला आहे, असे राजू शेट्टी म्हणाले.

शेतकऱ्यांना वारंवार नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणजे शेतीमध्ये मी गुंतवलेली रक्कम आणि शेतीमाल विकून मला मिळालेली रक्कम याच्यामध्ये आरिष्ट दुरावा तयार होत आहे. रोजगार निर्माण करतो याचा बहाणा दाखवून देशातील उद्योगपतींनी राष्ट्रीयकृत बँकेतून लाखो कोटीची कर्जे उचलली व गेल्या १० वर्षात काही मूठभर उद्योगपतींचे व्यवसाय तोट्यात गेले, असे निवेदनात म्हटले आहे.



# लाडकी बहीण योजनेच्या कागदपत्र पुर्ततेसाठी विशेष शिबीर

। म्हसळा । वार्ताहर ।

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना ज्या ज्या कागदपत्रांची आवश्यकता लागेल ती सर्व कागदपत्रे लाभार्थ्यांना वेळेत उपलब्ध करून द्यावीत. जेणेकरून लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. ग्रामसेवक, तलाठी आणि या योजनेत असणाऱ्या सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गाव पातळीवर अशा प्रकारची शिबिरे आयोजित करून कागदपत्राची पूर्तता करावी, असे निर्देश म्हसळा तहसिलदार समीर घारे यांनी दिले.

महिला व बालकल्याण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या लेखी आदेशानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत भरावयाच्या अर्जाबरोबर लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता वेळेवर व्हावी आणि जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने तहसीलदार घारे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार कार्यालय म्हसळा येथे एका सभेचे आयोजन करण्यात आले.

पान १ वरून

## आमदारांना हवं फुकटचं श्रेय

दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. ते तातडीने बंद करुन सरकारने कृषी विभागाच्या जागेत रुग्णालयाची अद्ययावत अशी वास्तू उभारावी, अशी मागणी शेकापचे आमदार जयंत पाटील यांनी गेल्या पावसाळी अधिवेशनात केली होती. यावर उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी अधिवेशन संपेपर्यंत याबाबत बैठक घेऊन सरकारने तोडगा काढावा, असे निर्देश सरकारला दिले होते.

दरम्यान, मुंबईत बुधवारी २०२४ रोजी झालेल्या हाय पॉवर कमिटीच्या बैठकीत या सरकारी रुग्णालयाच्या नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि मुख्य सचिव उपस्थित होते.

### असे असेल रुग्णालय

**रायगड जिल्हा शासकीय रुग्णालयाची नवी इमारत सात मजली असणार आहे. २ लाख स्केअर फूट इतके बांधकाम करण्यात येणार आहे. यामध्ये ३८० बेडना शासनाने मंजुरी दिली आहे. सुमारे सव्वा ४०० कोटी रुपये या रुग्णायलयाचे अंदाजपत्रक आहे. पैकी इमारत बांधकामासाठी १५० कोटी ६८ लाख निधी खर्च होणार आहे.३०० बेडसह २० बेडचे वेगळे आयसीयू कक्ष असणार आहे. १६ बेडचे नवजात बालकक्ष, २० बेडचे डायलिसिस सेंटर, रुग्ण थांबा कक्ष, अपघात विभाग तसेच अपघात विभागात वेगळे शस्त्रक्रिया कक्षही उभारले जाणार आहे. इमारतीत पाच मोड्युलर अद्यावत असे यंत्र सामुग्रीसह शस्त्रक्रिया कक्ष ही बांधले जाणार आहेत. यामध्ये अथम, अर्थो, जनरल, स्त्री रोग शस्त्रक्रिया कक्ष असणार आहे. एचआयव्ही, एचएसबी बधितासाठीही वेगळे शस्त्रक्रिया कक्ष राहणार आहे. याशिवाय लॉड्री, पाककक्ष, क्ष-किरण कक्ष, चार लिफ्ट, दोन जिने, एक रॅम्प अशी सुविधा इमारतीमध्ये असणार आहे.**

## खारभूमी योजनांची कामे मार्गी लावा

तालुक्यातील खारभूमी योजनेची कामे मागील ३० वर्षापासून प्रलंबित आहेत. त्यामुळे समुद्राचे पाणी शेतामध्ये शिरल्याने येथील शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.

निधी मंजूर होऊन कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. तरीदेखील केवळ तीन हजार मीटर पर्यंतचे काम केल्याचे निदर्शनास आले आहे. आवश्यक असलेल्या या योजनेअंतर्गत ५.५ किलोमीटरचा बंधारा व पाच उघडी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली, याबाबत खुलासा करावा, असा प्रश्न आ. जयंत पाटील यांनी उपस्थित केला.

यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, बृहत आराखड्यानुसार रायगड जिल्ह्यात १६५ योजना राबविण्यात येत असून २२ हजार ५५९ हेक्टर क्षेत्र संरक्षित करण्याचे नियोजन केले आहे. १६५ योजनांपैकी १३१ खारभूमी योजना पूर्ण झाल्या आहेत. अलिबाग तालुक्यात ३६ खारभूमी योजना असून सर्व योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनेंपैकी बहुतांश योजनेचे नूतनीकरण होऊन पंधरा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अतिवृष्टी, वादळे, मोठी उधाणे यामुळे या योजना कमकुवत झाल्या असून त्यांना खांडी जात आहेत. गावाबरोबरच नागरिकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने दुरुस्तीची कामे हाती घेऊन भरतीचे पाणी शेतात व गावात घुसणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच उधाणामुळे अलिबाग तालुक्यातील नुकसान झालेल्या खारभूमी योजनांच्या नूतनीकरणाचे कामे हाती घेण्यात येत आहेत.

## मुंबई सुंदर करताना जुळी मुंबई भकास करु नका

देवेंद्र फडणवीस यांनी दिले. झोपडपट्टी धारकांना योजनेनुसार सदनिकेचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत प्रतिबंध करण्यात आला आहे. झोपडी हस्तांतरणासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे. सदनिकाधारकांच्या जवळच्या नात्यात म्हणजेच पती, पत्नी, मुलगा, मुलगी, नातू, विधवा सुन यांना बक्षीस पत्राद्वारे हस्तांतरण करावयाचे झाल्यास त्यासाठी २०० रूपये शुल्क शासनाने आकारण्यात आले आहे, असे सहकार मंत्री अतुल सावे यांनी सविस्तर उत्तर दिले.

## हिरा निवास बिल्डींगच्या दुसऱ्या मजल्यावर आग

सचिन कोरके हे जवान घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पाण्याने आग विझविण्यास सुरूवात केली. आग मोठ्या प्रमाणावर भडकत असल्याने जवानांना मोठी कसरत करावी लागली. यामधील शुभंम करडे व मितेश माळी यांनी बिल्डींगमध्ये प्रवेश करुन पहिले दोन भरलेले सिलिंडर बाहेर काढल्याने सर्वांची धाकधुक कमी झाली.

या जवानांमुळे ही बिल्डिंग वाचली नाही तर या सिलिंडरमुळे पूर्णत: बिल्डिंग व बाजुच्या घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली असती. या आगीत फ्रिज, वॉशिंग मशीन, ३ गिझर, २ बेड , सोफा बेड- २, २ कुशन खुर्ची ,संगणक सेट , ५ एसी , कपडे, भांडी, किचन ट्रॉली, २ टिव्ही, ४ पंखे , लाकडी दरवाजे, अंतर्गत सजावटीचे नुकसान आदीसह लाखो रुपयांचे घरगुती सामान या आगीत भस्मसात झाले.

## विद्यार्थ्यांसाठी तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्या

चाचणी घेतली जाणार आहे. मागील इयत्तेचा अभ्यासक्रम, अध्ययन निष्पत्ती, मुलभूत क्षमता यावर ही चाचणी आधारित असेल. शालेय वेळापत्रकानुसार सकाळ किंवा दुपारच्या सत्रात चाचणी आयोजित करण्याचे, तसेच लेखी परीक्षेनंतर त्या दिवशी तोंडी परीक्षा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पायाभूत चाचणीसाठी प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा इंग्रजी या विषयांच्या विद्यार्थिनिहाय प्रश्नपत्रिका राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेकडून पुरवल्या जाणार आहेत. परीक्षेच्या दिवशी सर्व विद्यार्थी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी, एखादा विद्यार्थी गैरहजर असल्यास तो हजर होईल त्या दिवशी परीक्षा घ्यावी. पायाभूत चाचणीतील संपादणुकीच्या आधारे शिक्षकांनी कृतिकार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करावी. त्यामुळे विद्यार्थ्यांची संकलित चाचणीमध्ये संपादणूक वाढण्यास मदत होईल, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

गटशिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी, तालुका समन्वयकांनी विद्यार्थिनिहाय प्रश्नपत्रिकांच्या पुरवठ्याची खातरजमा करून घ्यावी. तालुका समन्वयकांनी प्रश्नपत्रिका मोजूनच मुख्याध्यापकांच्या ताब्यात द्याव्यात. प्रश्नपत्रिकांची गोपनीयता राखावी. शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या सांख्यिकीय माहितीनुसार प्रश्नपत्रिकांचे वितरण होणार असल्याने त्या कमी पडल्यास किंवा छायांकित प्रती काढाव्या लागल्यास त्याचे देयक दिले जाणार नाही. त्याबाबतची जबाबदारी शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक, प्रशासन अधिकाऱ्यांची असेल, असे स्पष्ट करण्यात आले.

## अंबादास दानवेंना निलंबनातून सूट

आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही चर्चा केली. अंबादास दानवेयांनी माफीचे पत्र देखील लिहिलं होते. या प्रकरणी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील माफी मागितली होती. यातच कारवाई करताना दानवे यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली नसल्याचा आरोप आमदार अनिल परब यांनी केला होता.

## निवृत्त सदस्यांची कामगिरी प्रेरणादायी- मुख्यमंत्री

राज्यातच हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाकडे आदरानं पाहिलं जातं. या देशाला संसदीय कार्यप्रणालीचा आदर्श घालून देणारी व्यक्तिमत्वं, अनेक दिग्गज, विद्वान या सभागृहाचे सदस्य होऊन गेले आहेत. या सभागृहातूनच महाराष्ट्राच्या सामान्य नागरिकांच्या जीवनाशी निगडीत महत्वाचे असे कायदे केले गेले आहेत. आज निवृत्त होणाऱ्या सदस्यांनी या सभागृहाच्या परंपरेला पुढे नेण्याचे काम केले आहे. राज्याच्या वरिष्ठ सभागृहात विविध संसदीय आयुधांचा वापर करुन जनतेचे प्रश्न मांडण्याचे काम या सर्व सदस्यांनी केले. आपल्या कामातून या सर्वांनी वरिष्ठ सभागृहाचा लौकिक वाढविला असून जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे, असे ही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## मनोज जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ

बुधवारी (दि.३) जरांगे पाटलांना झेड प्लस सुरक्षा देण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजी नगर येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको करण्यात आला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवली सराटी येथील ते राहतात त्या निवासस्थानी आणि आंदोलनाच्या ठिकाणी रात्रीच्या वेळी काही अज्ञात ड्रोनद्वारे टेहळणी केल्याचा प्रकारसमोर आल्यानंतर राज्यभरातून त्यांना सुरक्षा पुरवण्याची मागणी होत होती. मनोज जरांगे पाटलांना सुरक्षा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून पाटलांसोबत आता चार शस्त्रधारी पोलीस आणि एक पोलीस व्हॅन तैनात असेल, असे मंत्री शंभुराज देसाई यांनी सांगितले.

## वसंत मोरेंचा वंचितला 'जय महाराष्ट्र'

शकतो. पुणे शहरात माझं मतदान नव्हतं, माझा तो भाग नव्हता तरीही मला चांगली मते मिळाली. माझ्यावर पहिला गुन्हा शिवसेनेत असताना दाखल झाला. मी बदलणार नाही, जनतेसाठी, जनतेच्या हितासाठी काम करत राहणार आहे. उद्धव ठाकरे गटात प्रवेश केल्यानंतर वसंत मोरेंना हडपसर किंवा खडकवासला या विधानसभा मतदारसंघातून आमदारकीचं तिकीट मिळू शकते. वसंत मोरे यांना पुण्यातून वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दिला होता. मात्र, तरी त्यांचा पराभव झाला होता. आता ते ठाकरे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. वसंत मोरे यांची स्वतःच्या जीवावर निवडून येणारे नेते अशी ओळख आहे. त्यांनी राज ठाकरेंचे आदेश कधीच मोडले नाहीत. मनसेच्या प्रत्येक आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कोरोना काळात वसंत मोरे यांच्या कामाचे सर्वांनीच कौतुक केले होते. जनतेची केलेली सेवा ते व्हिडीओमार्फत सोशल मीडियावर टाकतात. त्यामुळेच त्यांना राज्यभरात ओळख मिळाली आहे.

# रामनाथ गायकवाड यांचे निधन

। उरण । प्रतिनिधी ।

उरणमधील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक रामनाथ सखाराम गायकवाड (वय ९२ वर्षे ) यांचे मंगळवारी (दि.२) रोजी वृध्दापकाळाने त्यांच्या घरी कोटनाका येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, १२ नातवंडे ,१६ पतवंडे असा त्यांचा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि. ११) सकाळी ८ वा. श्री क्षेत्र माणकेश्वर उरण येथे तर उत्तर कार्य रविवारी (दि १४) सकाळी त्यांच्या राहत्या घरी आनंदी हॉटेलच्या बाजूला, प्रवीण इंजिनिअर वर्क, कोटनाका येथे होणार आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| नजीर हाजी अमहंद लोगडे | १३२/३/अ | विकत देणार यांचे मालकीचे विकत घेत असलेले क्षेत्र | १२-३४ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०३/०७/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज १९/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रति
श्री. कुमुदिनी शाम सुभेदार — अर्जदार
रा. शिवाजीनगर, चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड

विरूद्ध

ग्रुप ग्रामपंचायत चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे पती कै. शाम पंढरीनाथ सुभेदार यांना मृत्यु दि ०४/१२/२०२१ रोजी चेंढरे येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत चेंढरे येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत चेंढरे यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २४/०७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/०७/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : ४/७/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

अर्जदारांतर्फे वकील श्री अमित म देशमुख
दि. चौकशी अर्ज नं. ८९/२०२४

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

श्रीम. वैशाली विनायक जोशी वगैरे १ — अर्जदार
विरुध्द
श्री.बाळकृष्ण नारायण जोशी — सामनेवाला

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, या अर्जातील अर्जदार हे कै. विनायक नारायण जोशी यांचे वारस आहेत. कै. विनायक नारायण जोशी हे दि. ०७.०३.२०२३ रोजी अलिबाग येथे विना मृत्युपत्र मयत झाले आहेत. अर्जदार यांचेखेरीज मयत कै. विनायक नारायण जोशी यांना कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार नं. १ ही कै. विनायक नारायण जोशी यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २ हा मुलगा असून व सामनेवाले हे त्यांचे सख्खे भाऊ आहेत व खाली नमूद मिळकतींमध्ये सामनेवाले हे सहहिस्सेदार आहेत. मृत्युसमयी कै. विनायक नारायण जोशी यांचे मालकीची मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाच्या जमिन मिळकती होत्या.

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र (चौ.मी) | टेन्युअर |
|---|---|---|
| ७३९/बी | २७९.०० | सी |
| ७६० | १४१.३० | क |
| ७६०के | २४४.१० | अ |
| ७६०/१ | २०.९० | अ |
| ७६०/२ | २०.९० | अ |

तसचे उपरोक्त जमिन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या इमारतीमधील सदनिका व दुकानगाळ्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे

| सदनिका क्रमांक | अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक | मजला | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|
| १०१ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120/1567) | पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका | ८९.७५ |
| १०२ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120/1567) | पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका | ८३.७५ |
| २०१ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120/1567) | निवासी सदनिका | ४३.०६ |
| ०१ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120 / 1567) | दुकान गाळा | १०३.५५ |
| ०२ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120/ 1567) | दुकान गाळा | १२.४० |
| ०३ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120/ 1567) | दुकान गाळा | ११.७० |
| ०४ | ALB000004077 (जुना क्र. Z1BHA004120/ 1567) | दुकान गाळा | २७.४५ |
| ०१ | ALB000001868 (जुना क्र. Z1BHA001881/1568) | निवासी-इतर | २७.१९ |

या मिळकतीबाबत वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळणे आवश्यक असल्याने अर्जदार व सामनेवाले हेच कै. विनायक नारायण जोशी यांचे कायदेशीर वारस असलेबद्दल वारसा दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) अर्जदार यांचे नांवे मिळावा म्हणून अर्जदारांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराचे मागण्यांप्रमाणे अर्जदार व सामनेवाले यांना कै. विनायक नारायण जोशी यांचे वारस असल्याचे जाहिर करून अर्जदार यांचे नांवे वारस दाखला देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा दि. १६/८/२०२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहुन आपली हरकत कळवावी.

वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदारांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. विनायक नारायण जोशी यांचे अर्जदार हे वारस असल्याचे जाहिर करून अर्जदार यांचे नांवे वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवुन मे कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देण्याचा हुकूम करेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दि. ३/७/ २०२४ रोजी माझे सहिनीशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

सही/- **(लिपीक)** **दिवाणी न्यायालय क. स्तर अलिबाग**

सही/- **(अधिक्षक)** **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग**

सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **मे. नियती होम्स एलएलपी तर्फे भागीदार १) दिलीप तुकाराम दरेकर २) दिनेश दत्ताराम माहुलकर ३) निमीश प्रतापराय वोरा ४) प्रवीण पंढरीनाथ दरेकर ५) समीर विठ्ठल दरेकर, राहणार – मु. पो ०१, अल मंजील, सिटीजन हाय स्कुल जवळ, उरण –४००७०२**------- (अर्जदार)

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे **मे. ऑरा बिल्डकॉन तर्फे भागीदार १) श्री. वेलजी विशा मेनात २) श्री. रणछोड शिवजी चंदात ३) श्री. हर्षल विनोद जैन** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा दिनांक | त्रिपक्षीय करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | | |
| २८७६ | १३.०६.२०२४ | पुष्पक नोड | २६ | ३६७ | ४६० चौ. मी. पैकी २३० चौ. मी. | २६.०८.२०२२ | ०७.११.२०२२ | ३०.११.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''**ना हरकत प्रमाणपत्र**'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०५०/२०२४-२५

**ग्रुप ग्रामपंचायत साळवे**
**ता. माणगाव, जि. रायगड**
**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत साळवे खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदारा/पुरवठादाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/वस्तूचे नाव | कामाचे परिमाण (संख्या) | निधीचा स्तोत्र | रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा | | | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | | |
| १ | सिताराम तेटगुरे ते शांताराम शिंदे गटार बांधणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२१/२२ व २०२३/२४ ग्राप स्तर | १४१७६१/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.प. कार्यालय | १४९७/- | १००/- |
| २ | घाणोसे आदिवासीवाडी नळ पाणीपुरवठा योजना करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२२/२३ ग्राप स्तर | ८०५७९/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ८०५/- | १००/- |
| ३ | साळवे आदिवासीवाडी येथे बोअरवेल मारणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२२/२३ ग्राप स्तर | ६४९७६/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६५०/- | १००/- |
| ४ | स्वच्छतेविषयक साहित्य खरेदी करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | १८६०९/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |
| ५ | गावांकरीता व मागासवर्गीय वस्तीत शववाहिनी पुरवणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | ८००००/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |
| ६ | धानोसे आ. वाशी वाडी शाळा पाणी सुविधा करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | ३३६०९/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ३३६/- | १००/- |
| ७ | नळ पाणी पुरवठा योजना मोबाईल किट बसविणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | २५०००/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |
| ८ | पाणी शुद्धीकरण साहित्य पुरविणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | १८६०९/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |
| ९ | पा.पु. नळ पाणीपुरवठा योजना दुरूस्त करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | ४७२६५/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ४७२/- | १००/- |
| १० | पानोसे हद्दीतील विहीर साफसफाई करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | ६४२८०/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६४२/- | १००/- |
| ११ | साळवे अंगणवाडी पाणी सुविधा देणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | २३४३६/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २३४/- | १००/- |
| १२ | पौष्टिक पदार्थांचे वितरण | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | २००००/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |
| १३ | शाळांमध्ये व अंगणवाडी बालस्नेही कॉर्नर उभारणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | २००००/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |
| १४ | साळवे अंगणवाडी शौचालय दुरूस्ती | १ | १५ वा वित्त आयोग २०२३/२४ ग्राप स्तर | ५००००/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५००/- | १००/- |
| १५ | ग्रा.पं. करिता संगणक साहित्य खरेदी करणे | १ | १५ वा वित्त आयोग २०२१/२२ ग्राप स्तर | ७३०००/- | ६ महिने | ११/०७/२०२४ | सायं ५.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | - | - |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि.१२/०७/२०२४ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा.पं. साळवे येथे मा.सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. प्रशासक साळवे यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे प्रशासक साळवे यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.
६) १५ वा. वित्त आयोग ग्रा.पं. स्तर निधी उपलब्ध झालेनंतरच देयक अदा करण्यात येईल.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत साळवे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत साळवे**
**ता. माणगाव, जि. रायगड**

निवडक

## उरणमध्ये घरफोडी

**उरण :** परिसरातील चाणजे गावात दोन घरफोड्यांची घटना घडल्या असून दोन्ही घरातील दरवाजे तोडून घरातील माल लंपास केला आहे. चाणजे येथील संजय म्हात्रे आणि अजित पुरों हे मुंबई व ठाणे येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांची घरे बंद असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी दि. १ जुलै रोजी रात्री घरफोडी करून घरातील चांदीच्या वस्तू व कपाटातील रोख रक्कम लंपास करण्यात केली आहे. याबाबतची तक्रार उरण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

## तळोजात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** मागील महिन्यात तळोजा येथील घोटगावाजवळ अरिहंत अनंत कन्स्ट्रक्शन कंपनीचे काम सुरु असताना दि.१६ जून रोजी ३६ वर्षीय तरुणाचा इमारतीवरुन पडून मृत्यू झाला होता. या मृत तरूणाचे नाव प्रविण शिंदे असे असून ठेकेदार पंकज पटोलिया याच्या दुर्लक्षितपणामुळे इमारतीचे बांधकाम सुरु असताना उदवाहकासाठी जागा खुली सोडून त्यावर कोणतीही व्यक्ती जाऊ नये यासाठी सुरक्षेचे कोणतेही उपाय न केल्यामुळे तेथुन खाली कोसळल्याने ते जागीच ठार झाले होते.

## हजारो रूपयांची फसवणूक

**रोहा :** खैरे खुर्द येथील माजी पोलीस निरीक्षक यांच्या फेसबुक मेसेंजरवर एका व्यक्तीने मेसेज केला कि, माझा मित्राची सीआरपीएफ पोलीस दलातून बदली झाली असून त्यांच्याकडे असलेले फर्निचर कमी किंमतीत विकायचे आहे. यानंतर व्हॉटसअॅप करून त्या मेसेजवर माजी पोलीस निरीक्षकांनी विश्वास ठेवून त्या व्यक्तीच्या सांगण्यानुसार एकूण ६१,५०० रू दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्यावर पाठवले होते. परंतु, त्यांच्या मोबदल्यात फर्निचर न देता फसवणूक करण्यात आली. याबाबत रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोटारसायकलचा अपघात

**माणगाव :** भागाड गावच्या हददीत दुचाकी (एम एच-४६-एव्ही-१२७१) चालक पुणे बाजुकडुन माणगांवकडे जात असताना दुचाकी अतिवेगाने रस्त्याच्या परस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवत रॉग साईडला येत समोर असलेली कार (एमएच-०६-बीडब्लु-८४३९) ला धडक देवुन अपघात केला. या अपघातात दुचाकीचालक जखमी झाला असून दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह प्रफुल्ल पवार हे करीत आहेत.

## दुचाकीला टेम्पोची धडक

**खालापुर :** उंबरे ग्रामपंचायत ऑफिसच्या समोर पालीकडुन खोपोलीकडे जाणारा टेम्पो (एमएच-४६-सीएस-९९५२) चालक टेम्पो वेगाने व रॉंग साइडने चालवुन समोरून येणाऱ्या दुचाकीला (एमएच-०६-सीजे-९८७७) धडक मारुन अपघात केला आहे. या अपघातामध्ये दुचाकी चालकाला गंभीर स्वररुपाच्या दुखापती झालेल्या असुन त्याच्या दुचाकीचे नुकसान झाले आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा निलेश सोनावणे हे करीत आहेत.

# भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आपल्या पदाचा गैरवापर करीत महसूल दप्तरी बदल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मंगळवारी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली असून जिल्हाधिकारी यांच्यावतीने तहसीलदार चंद्रसेन पवार यांनी हे निवेदन स्विकारले आहे. येत्या सात दिवसांत तक्रार अर्जाची दखल घेण्यात यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल, अशा इशारा विजय पाटील यांच्याकडून देण्यात आला आहे.

दादर येथील सर्व्हे नंबर ४६२ सरकारी आकार पड जमीनीमधील खोटे दस्तऐवज सादर करून तलाठी दप्तरी खोटे सातबारा बनविले होते. याची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी याबाबत लेखी तक्रार केली होती. त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात याबाबत सुनावणी झाली. सुनावणीतून पेणमधील उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशानुसार खोटे बनविलेला सातबारा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली. परंतु, केवळ शासकिय अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण संबंधातून चुकीची माहिती देऊन महसूल दप्तरी बदल करणे चुकीचे आहे. त्यामुळे दप्तरात केलेले खोटे बदल करणारा कर्मचारी त्याला जबाबदार असल्याचा आरोप विजय पाटील यांनी केला आहे.

सातबारा उताऱ्यावर केलेली खाडाखोड, फेरफारमध्ये केलेले बदल तसेच जाणून बुजून खरा अहवाल लपविण्याचा प्रयत्न संबंधित अधिकाऱ्यांनी केला आहे. भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे महसूल विभागाला ठपका लागत आहे. त्यामुळे खोटे कागदपत्रे, खाडाखोड करणाऱ्या या अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे.

येत्या सात दिवसांत अर्जाची दखल घेण्यात यावी अन्यथा उपोषण करण्यात येईल, असा इशारा विजय पाटील यांच्याकडून निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## कळंबोली शाखेतर्फे मार्गदर्शन

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली येथील वाहतूक शाखेतर्फे पादचाऱ्यांना रस्ता व वाहतुकीसंदर्भात मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले. कळंबोली वाहतूक शाखा हद्दीत सर्कल या ठिकाणी कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिर्के, पोलीस उपनिरीक्षक साठे व पथक यांनी पादचारी यांची बैठक घेऊन रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंगचा वापर कधी व कसा करावा, याबाबत सूचना देऊन प्रबोधन केले. तसेच, अपघातग्रस्तातील जखमींना मदत करण्याबाबत समजावून सांगून वाहतूक नियमांचे पालन करण्यासंदर्भात प्रबोधन करण्यात आले आहे.



# चौल-पाझर येथे वृक्षारोपण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

चौल येथील पाझर येथे कृषक कल्याणकारी संस्था आयोजीत वृक्षारोपण कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न झाला. या स्तुत्य उपक्रमास कृषक कल्याणकारी संस्था यांना रेवदंडा जेष्ठ नागरिक संघ व निसर्ग प्रेमी संस्था यांचे श्रमदान व विशेष सहकार्य लाभले.

दरवर्षी प्रमाणे चौल कृषक कल्याणकारी संस्थेच्या वतीने दि.३० जुन रोजी चौल-पाझर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाला एम. डी. तायडे यांचे बहुमूल्य सहकार्य लाभले. तसेच, कृषक कल्याणकारी संस्था चौल, रेवदंडा जेष्ठ नागरिक व चौल निसर्ग प्रेमी संस्था सोशल मिडिया ग्रुप यांचे सदस्य उपस्थित होते. यावेळी आवळा, करंज, चिंच, खैर, जांभूळ, वड, भावाह, काजू, आपटा, आदी एकूण १०० रोपांची लागवड करण्यात आली.

# लाडकी बहीण संभ्रमात



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण योजना' सुरु करण्याची घोषणा राज्याच्या अर्थसंकल्पात झाली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहेत. या योजनेसाठी सर्व प्रक्रिया ऑनलाईन होणार आहे. परंतु, योजना जाहीर होऊन चार दिवस झाले तरी पोर्टल अद्याप सुरु झालेले नाही. लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यानंतर त्यासाठी लागणारी कागदपत्रे जमवण्यासाठी सलग तिसऱ्या दिवशी महिला व काहींचे पती शासन दरबारी फेऱ्या मारुन कागदपत्रे गोळा करून ठेवली पण हे कागदपत्रे ऑफलाईन पद्धतीने भरायचे की ऑनलाईन भरायचे, हे ही माहित नसल्याने महिला संभ्रमात पडल्या आहेत. या संदर्भात नायब तहसीलदार संजय तवर यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, ऑफलाईन अर्ज कोण स्विकारणार या संदर्भात माहिती नाही आहे. परंतु, सेतू सुविधा केंद्रामध्ये होवू शकतो. परंतु, त्याचे ही निर्देश आले नाहीत, अशी माहिती त्यांनी दली.



सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या २९५ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त गाज फाउंडेशन आणि अलिबाग नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिवादन कार्यक्रमात नौसेना कमांडर ऋषीराज कोहली यांनी कान्होजी आंग्रे यांच्या समाधीला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी रघुजीराजे आंग्रे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, माजी उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल चोप्रा, संजना किर आदी उपस्थित होते.

## झाड कोसळून नुकसान

**पनवेल :** वीर सावरकर चौकामध्ये गुरूवारी सकाळी चारचाकी आणि एका दुचाकीवर झाड पडल्याने दोन्ही गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पनवेल महापालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन झाडे तोडण्याच्या मशीनच्या साहाय्याने वाहनांवरील आणि रस्त्यावरील पडलेले झाड कापून बाजूला केले व रस्ता वाहतुकीस खुला करून दिला. याठिकाणी जयेश कांबळे, कल्पेश पालेकर, सागर वर्तक, आशुतोष खानावकर, विकास घरत, सचिन मोहोकर आणि स्वच्छता कर्मचारी सहभागी होते.

## खारीचे नमुने परिक्षणासाठी रवाना




**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील प्रभात बेकरी येथील खराब खारीची तक्रार दि.२४ जून रोजी नगरसेवक संतोष पाटील यांनी सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन पेण यांच्याकडे लेखी स्वरूपात केली होती. त्या अनुषंगाने मा. रा. घोसलवाड यांनी २८ जून रोजी प्रभात बेकरी येथील खारीचे नमुने घेउन विश्लेषणासाठी पुढे पाठविले असून, त्या खारीच्या नमुन्याचे विश्लेषण आल्यावर बेकरीविरूध्द अन्न सुरक्षा व मानदे कायदा अंतर्गत पुढील योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र संतोष पाटील यांना देण्यात आले आहे. तसेच, कृषीवल प्रतिनिधी यांनी मा. रा. घोसलवाड सहाय्यक आयुक्त (अन्न) यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, बेकरी मालकाविरूध्द कायदेशी कारवाई केली जाईल. फक्त खारीच्या नमुन्याचा रिपोर्ट येण्याची वाट बघत आहोत. तसेच, त्यांना नोटीस देखील दिली असून बेकरीतील कामगारांबाबत विचारणा केली आहे, असे ते म्हणाले.

# शालेय विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष निवडणुकीचा अनुभव



**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

राजिप शाळा सिद्धेश्वर येथे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मतदानप्रक्रियेत सहभाग घेता यावा यासाठी तसेच ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजण्यासाठी मुख्यमंत्री पदाची प्रत्यक्ष निवडणूक घेण्यात आली.

या निवडणूक प्रक्रियेअंतर्गत २९ जून रोजी अर्ज दाखल करून १ जुलै रोजी उमेदवार अर्ज मागे घेऊन अंतिम उमेदवार यादी करण्यात आली. मुख्यमंत्री पदासाठी जगदीश झोरे, स्वरा मुंढे, ऋग्वेद मोरे हे उमेद्वार होते. २ जुलै रोजी प्रत्यक्ष मतपत्रिका देऊन विद्यार्थ्यांनी मतदान कक्षात मतदान केले.

यावेळी मतदान प्रतिनिधी म्हणून आराध्य यादव, साईराज कदम, पवन चव्हाण यांनी काम पाहिले. तर, मतदान अधिकारी म्हणून स्वप्नाली मेमाने, जनार्दन भिलारे आणि प्रेसायडिंग ऑफिसर म्हणून मुख्याध्यापिका रोहिणी खामकर यांनी काम पाहिले. मतपेटीतील मते मतदान प्रतिनिधी समोर मोजणी करून सर्वाधिक मते ऋग्वेद मोरे याला मिळाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी खामकर यांनी विजयी घोषित केले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांनी निवडणूक प्रक्रियेचा आनंद प्रात्यक्षिकाद्वारे घेतला. या उपक्रमाचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रवींद्र यादव, केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे यांनी कौतुक केले.

# नागाव येथे कृषीदिन साजरा



## किसान गप्पा गोष्टी स्तुत्य उपक्रम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुका कृषी अधिकारी प्रदीप बैनाडे व नागाव सरपंच हर्षदा मयेकर यांच्या विद्यमाने महाराष्ट्र शासन कृषी विभागाचा कृषीदिन व किसान गप्पा गोष्टी उपक्रम दि. १ जुलै रोजी नागाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कृषीदिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे या होत्या. तर सरपंच हर्षदा मयेकर, उपविभागीय कृषी अधिकारी वानखेडे, प्रकल्प उप संचालक भांडवलकर, कृषी विभाग अधिकारी चौधरी, सदस्य निखिल मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, मुख्य वक्ते गुरसाळे, ग्रामविकास अधिकारी श्वेता कदम, सदस्या अंकिता शेवडे, लिना भगत, रिना पिंपळे, निकिता पाडेकर, सदस्य परेश ठाकुर, तसेच मोठ्या संख्येने नागाव पंचक्रोशीतील शेतकरी व बागायतदार यांची उपस्थिती होती.

यावेळी गप्पा गोष्टी कार्यक्रमाच्या निमित्ताने येथील उपस्थितांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेबद्दल विशेष माहिती देण्यात आली. तसेच, मुख्य वक्ते गुरसाळे सर यांनी उपस्थितांना सेंद्रीय खते व रासायनिक खते याबाबत मार्गदर्शन केले.

> शेतकरी हा देशाचा कणा असून शेतकऱ्यांसाठी पुरक वातावरण निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. तसेच, सरकारी सर्व योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी नागाव ग्रामपंचायत सरपंच म्हणून कटीबद्ध राहीन.
> - हर्षदा मयेकर, सरपंच, नागाव

## रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल परिसरातील अनेक रस्त्यांची अवस्था दयनीय झाली असून या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्यावतीने पनवेल महानगर पालिकेकडे केली आहे. शिवसेना शहरप्रमुख यतिन देशमुख यांनी महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांची भेट घेऊन नविन पनवेल शहरातील रस्त्यांच्या झालेल्या दुरावस्थेबद्दल निवेदन दिले. त्याचप्रमाणे महानगर गॅसचे काम करताना रस्ते पूर्णपणे खराब झाले आहेत. यावर तत्काळ उपाय केले गेले नाहीत तर शिवसेना आपल्या पद्धतीने आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला. यावेळी किरण तावदारे, किरण सोनावणे, दिपक शेडगे, गोविंद जोग, ओमकार धावडे, मृण्मय काणे हे उपस्थित होते.

## मार्केट जवळील धोकादायक गटार

**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील गजबजलेल्या भाजी व मच्छी मार्केट जवळील धोकादायक असे गटार सध्या अपघाताला कारणीभूत ठरत आहे. तरी या धोकादायक गटाराच्या दुरुस्तीकडे उरण नगरपालिकेने आपले लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी मार्केटमध्ये ये-जा करणारे नागरिक करत आहेत. उरण शहरातील भाजी व मच्छी मार्केटमध्ये मोठ्या संख्येने रहिवासी आपल्या दैनंदिन जीवनातील वस्तू, भाजी व मच्छी खरेदी करण्यासाठी ये-जा करत आहेत. या मार्केट जवळील रस्त्यावरील गटारांची दुरावस्था झाल्याने त्याचा त्रास हा ये-जा करणाऱ्या नागरिकांना सहन करावा लागत असून पादचाऱ्यांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. तरी धोकादायक गटाराच्या दुरुस्तीकडे उरण नगर परिषदेने लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी नरेश भोईर यांनी केली आहे.





# लायन्स क्लब रेटिना तपासणी शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब व लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग आणि आरसीएफ एक्स एम्प्लॉईज सोशल फोरम थळच्यावतीने फोरमचा वर्धापन दिन आणि डॉक्टर्स डेच्या निमित्ताने सोमवारी (दि.१) रेटिना तपासणी शिबिराचे आयोजन आरसीएफ वसाहत कम्युनिटी हॉलमध्ये करण्यात आले होते.

आरसीएफ थळ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संघटनेद्वारा संस्थेच्या सभासदांची डोळ्यांच्या पडद्याची होणारी झीज तपासणीसाठी लायन्स क्लबद्वारा शिबीराचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी २४० जणांची रेटिना तसेच उंची, वजन, रक्तदाब व रँडम शुगर तपासणी करण्यात आली. यावेळी डोळ्यांच्या पडद्याच्या तपासणीसाठी रेटिना स्पेशलिस्ट डॉ. अश्विनी करंजकर तसेच डॉ. शुभदा कुडतलकर आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. यावेळी लायन्स क्लब व हेल्थ फाउंडेशनच्यावतीने द्वितीय प्रांतपाल प्रवीण सरनाईक, संजय पाटील, प्रदीप नाईक, अॅड. गौरी म्हात्रे, नितीन अधिकारी, महेंद्र पाटील, प्रकाश देशमुख, भगवान मालपाणी, अॅड. गिरीश म्हात्रे, संतोष पाटील, नयन कवळे, अभिजित आमले व पदाधिकारी यांनी या शिबिरासाठी खूप परिश्रम घेतले. यावेळी महाप्रबंधक हरळीकर, भालचंद्र देशपांडे, प्रदीप नाईक, प्रविण सरनाईक, राकेश कवळे आदी उपस्थित होते.

## नविन मिनीबसची प्रतिक्षा कायम

# माथेरानकरांचा अडखळता प्रवास

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जतच्या एसटी आगारातून माथेरानसाठी निघालेली मिनीबस माथेरान घाटात तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली. तब्बल १२ तास उलटले तरी या मिनिबस जवळ अभियांत्रिकी विभागाचे कर्मचारी पोहोचले नव्हते. दरम्यान, जुन्या गाड्यांची वाहतूक मर्यादा संपली असून कर्जत-माथेरान मिनीबस मधून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना दररोज अडखळता प्रवास करावा लागत आहे. यामुळे येथील प्रवासी या रोजच्या समस्येला संतापले असून घोषणा झालेल्या नवीन मिनीबस कधी येणार, असा प्रश्न एसटी महामंडळाला विचारत आहेत.**

बुधवारी (दि.३) सकाळी सव्वाआठ वाजता कर्जत आगारातून माथेरानसाठी निघालेली मिनीबस माथेरान येथे सव्वानऊ वाजता पोहचली. तेथून पुन्हा कर्जतकडे परतत असताना माथेरान घाटातील जूम्मापट्टी येथील गणेश मंदिराजवळ तांत्रिक बिघाडामुळे थांबविण्यात आली. त्यामुळे नाईलाजाने मिनीबस मधून प्रवास करणारे प्रवासी व विद्यार्थी यांना खासगी वाहनातून पुढचा प्रवास करावा लागला. त्यामुळे वेळ आणि पैसा असा दोन्ही बाबींचे नुकसान झाले. तसेच, मिनीबसच्या दुरूस्तीसाठी तब्बल १२ तास उलटल्यानंतर रात्रीच्या सुमारास कर्जत आगारातील तांत्रिक कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर मिनीबस रात्री उशिरा कर्जत आगारात आणण्यात आली. या मिनीबसच्या गियरमध्ये तांत्रीक बिघाड झाला असून ब्रेक सुद्धा व्यवस्थित लागत नसल्याने बंद पडली होती.



> मिनी बसचे गियर किंवा संभाव्य ब्रेकमध्ये तांत्रीक बिघाडांच्या समस्या या तीव्र उतारावर होत असून दुर्देवी अपघाती घटना घडण्याची शक्यता आहे. यासाठी या घटनेची तीव्र दखल शासनाने घेऊन कर्जत आगाराला तत्काळ किमान दोन मिनी बसेस देण्याची मागणी त्वरित पूर्ण करावी. अन्यथा काही दुर्देवी अपघात झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार? जनतेने कोणाला जबाबदार धरावे?
> - नितीन सावंत, प्रवासी

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# असंगांशी सत्संग

असंगाशी संग, प्राणाशी गाठ अशी जुनी म्हण आहे. आता ती असंगासोबत सत्संग प्राणाशी गाठ अशी बदलून घ्यायला हवी. मंगळवारी उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये भोलेबाबा नावाच्या बुवाच्या सत्संगाच्या वेळी चेंगराचेंगरी होऊन एकशेवीस लोकांचे बळी गेले व सुमारे तीनशे जखमी झाले. मृतांमध्ये बहुसंख्य महिला व मुले आहेत. या घटनेला हा आयोजक बाबा, प्रशासन जितके जबाबदार आहे तितकेच या ठिकाणी गर्दी करणारे लोकही कारणीभूत आहेत. बाबाच्या पायाला स्पर्श करण्यासाठी आणि तो जिथून चालत गेला ती माती कपाळाला लावण्यासाठी एकाएकी अचानक गर्दी झाली असे प्राथमिक बातम्यांमध्ये म्हटले आहे. दोन-चार तास शांतपणे बसून या सर्व भक्तांनी बाबाचे दिव्य विचार ऐकले असतील. त्यातून सगळे जण प्रचंड आध्यात्मिक पातळीवर गेले असतील. हे जग, हे जीवन एक माया आहे किंवा सर्व मनुष्यप्राण्यांवरच नव्हे तर सर्व जिवांवर प्रेम करा असे काहीतरी विचार बाबाने सांगितले असेल. सगळे जण त्यात डुंबून निघाले असतील. मात्र त्यानंतर काहीच वेळात निव्वळ बाबाच्या पायाखालच्या माती मिळवणे ही त्या सर्वांच्या आयुष्यातील एकमेव महत्वाची गोष्ट झाली असेल. त्यासाठी शेजारच्याला मागे टाकून पुढे जाण्याची स्पर्धा लागली असेल. त्यासाठी प्रसंगी इतरांना तुडवून देखील पुढे जाण्यात त्यांना काहीही चुकीचे वाटले नसेल. बायका, काही महिन्यांची किंवा एक-दोन वर्षांची मुले आपल्या पायांखाली येतायत, आक्रोश करतायत आणि मरतायत याची तमा त्यांना वाटली नसेल. आता हे सर्व जण आपल्या परिचितांच्या मृत्यूबद्दल शोक करीत असतील. आपल्या कर्माला दोष देत असतील. पण कोणत्याही स्थितीत बाबाला मात्र जबाबदार धरणार नाहीत. आपण सत्संग केला म्हणजे नक्की काय केले याचा विचार करणार नाहीत. प्रेम आणि भक्तीविषयी इतके सर्व ऐकूनही आपण कोरडे कसे राहिलो असे त्यांना बहुधा वाटणार नाही.

## हवालदाराचा भोलेबाबा

हा जो कोणी भोलेबाबा आहे त्याला हा मजकूर लिहीपर्यंत तरी अटक झालेली नव्हती वा त्याची चौकशीही झाली नव्हती. हा मुळात उत्तर प्रदेश पोलिस दलात एक हवालदार होता. त्याचे नाव सूरजपालसिंग १९९० नंतर त्याने नंतर नारायण सरकार विश्वहरी अशा अजब नावाने बाबाचा अवतार धारण केला. आपल्याकडे दैवी शक्ती आहे, आपण भूतबाधेवर इलाज करतो, आपल्या हस्तस्पर्शाने आजार व दुखणी बरी होतात, अडचणी नष्ट होतात असा समज पसरवून त्याने जम बसवला. तो मुळात दलित समाजातला आहे. त्याचे भक्तही मुख्यतः दलित जातींमधील गरीब शेतमजूर, गवंडी, सफाई कामगार, सुतार, गालिचे विकणारे असे लोक आहेत. हा बाबा भक्तांकडून काही घेत नाही वा मागतही नाही अशी त्याची प्रसिध्दी आहे. मांस-मच्छी, दारु इत्यादी सेवन करू नका असे तो भक्तांना सांगतो. त्यामुळे त्याच्याभोवती एक सोवळेपणाचे व सात्विकतेचेही वलय निर्माण झाले. प्रत्येक गावात त्याचे सेवादार असतात. एखाद्या आमदाराच्या सोबतच्या लोकांना जसा मान मिळतो तसेच बाबाच्या दरबारातले हे सेवादार सत्ता गाजवत असतात. महाराष्ट्रातही आपल्याला हे चित्र परिचित आहेच. महाराजांच्या अवतीभवती वावरणारे, त्यांच्या सत्संग बैठका आयोजित करणारे हे तथाकथित सेवादार बाबा-महाराजांची प्रसिध्दी करणे आणि त्यांना पैसा मिळत राहील असे पाहणे हे उद्योग बरोबर करतात. सात वेळा बाबाचा सत्संग करणाऱ्यांनाच सेवादाराचा दर्जा मिळतो. (ही थेट आपल्या आसपासच्या बुवा-महाराजांकडच्या सारखी व्यवस्था आहे.) यांच्या जिवावरच या भोलेबाबाने आपले जाळे पसरवले होते. पोलिसांच्या नोकरीत असतानाच त्याच्यावर फसवणूक व विनयभंगाचे आरोप होते. त्यानंतर २००० मध्ये त्याने एका मृत मुलीला आपण जिवंत करू शकतो असे सांगून मोठा तमाशा केला होता. या मुलीचा मृतदेह त्याने नातेवाईकांकडून काढून घेतल्याने पोलिस केसही झाली होती. त्याला अटकही झाली होती. पण बहुदा त्याच्यामागे असलेली दलित समाजाची गर्दी पाहून सर्वच राजकारण्यांनी त्याला पाठीशी घातले असावे.

## आंधळी भक्ती

कालच्या सत्संगातही या बाबाने शंभर जणांची भूतबाधा उतरवली असे भाविक सांगतात. आता लवकरच प्रलय येणार आहे असे तो आपल्या प्रवचनाच्या अखेरीला म्हणाला होता. त्यानुसार ही दुर्घटना घडली म्हणजे स्थानिक लोकांच्या आयुष्यात प्रलयच आला असे म्हणायला हवे. अर्थात, इतके होऊनही हे लोक बाबाचे म्हणणे खरे ठरले असे म्हणून त्याचा जयजयकार करण्याचीच अधिक शक्यता आहे. आपले आप्तस्वकीय डोळ्यादेखत मरूनही बाबावर असलेली ही आंधळी भक्ती आणि त्याच्यामागची गर्दी पाहून त्याच्या पापांकडे दुर्लक्ष करणारे राजकारणी यांचे काय करणार हाच आजचा कळीचा प्रश्न आहे. धार्मिक कार्यक्रमांमध्ये अशा प्रकारची चेंगराचेंगरीची ही पहिलीच घटना नाही व शेवटचीही नसेल. किंबहुना, मांढरदेवी, नैनादेवी अशा दुर्गम भागांमध्येच नव्हे तर खारघरसारख्या शहरी भागात व मोकळ्या मैदानांवरही या घटना होऊ लागल्या आहेत. बाबामहाराजांचे प्रस्थ व त्यांच्याभोवतीची वाढती गर्दी पाहता या घटनाही वाढतच जाण्याची शक्यता आहे. या बाबा, बुवा किंवा महाराजांपैकी बहुतेक जण प्रचंड श्रीमंती थाटात जगत असतात. मोठे बंगले किंवा आश्रम, उंची गाड्या, विमानाने प्रवास असे सर्व चालू असते. अनेक प्रकारच्या धंदे-उद्योगांमध्ये यांच्या भागीदाऱ्या असतात. अनेकांविरुध्द गुन्हेगारीची प्रकरणे असतात. पंजाबमधील डेरा सच्चाबाबा सारखे लोक तर खून, बलात्कार, गँगवॉर अशा सर्वच गुन्ह्यांमध्ये आकंठ बुडालेले असतात. तरीही सर्व पक्षातल्या राजकारण्यांशी त्यांचे चांगले संबंध असतात. महाराष्ट्रात तर जागोजागी असे राजकारण्यांशी मैत्री असणारे बाबा आपल्याला दिसतात. आमदार, मंत्री, मुख्यमंत्री इत्यादींची बाकीचे पापे विसरून हे बाबा, महाराज त्यांना भरपूर आशीर्वाद देतात आणि स्वतःची कर्मेही झाकतात. सामान्य लोक इतके भाबडे आणि असहाय असतात की आपण असल्या असंगांशी सत्संग करतो आहे हे त्यांना कळत नाही आणि कळले तरी वळत नाही. त्यामुळे, अशी हाथरससारख्या अनेक घटना घडूनही बाबा मोकाट राहतात.

विचार

# जेवोनिया तृप्त कोण झाला?

हेमंत देसाई

१३ मार्च २०२३ रोजी तत्कालीन अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अर्थसंकल्प मांडला होता. स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू असल्यामुळे, या गोष्टीचा उल्लेख करून फडणवीस यांनी घोषणांचा पाऊस पाडला होता. शेतकऱ्यांसाठीच्या प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेप्रमाणेच महाराष्ट्र शासन हे प्रत्येक शेतकऱ्याला सहा हजार रुपये देईल, एक रुपयात पीकविमा, अपघातग्रस्त शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान, महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत पाच लाख रुपयांपर्यंत उपचार करता येणार, गुढीपाडव्याला आनंदाचा शिधा अशा अनेक घोषणा त्यांनी केल्या होत्या.

फडणवीस यांनी तुकोबांच्या अभंगांचा आधार घेतला, याचा उल्लेख करून तेव्हाचे विरोधी पक्षनेते अजितदादा पवार म्हणाले होते की, 'मी या अर्थसंकल्पाचे वर्णन, तुकोबांच्याच शब्दांत, 'बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात, जेवोनिया तृप्त कोण झाला?', याच रीतीने करतो'. यामधून जनतेला दिलासा मिळणार नाही, अशी टीकाही त्यांनी केली होती. 'फडणवीसांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात शिंदे आणि त्यांच्या सहकारी शिवसेना मंत्र्यांच्या खात्यांना ३४ टक्के निधी देण्यात आला आहे. तर फडणवीस आणि भाजपच्या इतर मंत्र्यांना मिळून ६६ टक्के निधी देण्यात आला आहे,' असा उल्लेखही अजितदादांनी केला होता. राज्यामध्ये महाविकास आघाडी सरकार असताना, अजितदादा आमच्या खात्यांना कमी पैसे देतात आणि बहुतांश निधी राष्ट्रवादीच्या खात्यांकडे खेचला जातो, असा आरोप शिंदे समर्थक मंत्र्यांकडून केला जात असे. त्यानंतर मग जेव्हा अजितदादा विरोधी पक्षनेते झाले, तेव्हा त्यांनी याच मुद्द्यावरून शिंदेसेना आणि भाजप यांच्यात लावून देण्याचा प्रयत्न केला. आता अजितदादांनी महायुतीचे अर्थमंत्री या नात्याने, २०२४-२५ चा अंतरिम अर्थसंकल्प मांडला असून, त्याचे कौतुक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.उलट, हा अर्थसंकल्प म्हणजे आश्वासनांची अतिवृष्टी आणि थापांचा महापूर आहे, अशी टीका महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री राहिलेल्या उद्धव ठाकरे यांनी केली आहे.अर्थसंकल्पातील घोषणांमुळे सरकारच्या तिजेरीवर एक लाख कोटी रुपयांचा बोजा येणार आहे.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीचा सपशेल पराभव झाला. आगामी विधानसभा निवडणुकीत पराभव डोळ्यांसमोर दिसत असल्यामुळे, वित्तीय शिस्त गुंडाळून सर्वांना खूश करण्याचा प्रयत्न अजितदादांनी केला आहे. या सर्व घोषणांमुळे सरकारच्या तिजेरीवर एक लाख कोटी रुपयांचा बोजा येणार आहे. परंतु या वर्षभरात सरकारचे उत्पन्न ४ लाख ८६ हजार कोटींवरून (२०२३-२४) चालू वर्षात ४ लाख ९९ कोटी रुपयांपर्यंतच वाढणार आहे. म्हणजे, उत्पन्नात १३ हजार कोटी रुपयांचीच वाढ दिसत आहे. पण सरकारच्या पायाभूत प्रकल्पांभोवतीची जमीन संपादित करून, त्यामधून महसूल मिळवण्याचा प्रयत्न असेल, असे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे. परंतु त्यास नक्कीच वेळ लागणार. अर्थसंकल्पात ७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या कृषिपंपांना मोफत वीज पुरवण्याची घोषणा करण्यात आली असून, त्यामुळे ४४ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

'मागेल त्याला सौर ऊर्जापंप' या योजनेत साडेआठ लाख सौर कृषीपंप देण्याचे सरकारने जाहीर केले आहे. पण सौर कृषीपंपांच्या वीजबिलांची महावितरणकडे ४४ हजार कोटी रुपयांची थकबाकी असून, ती माफ करण्याबाबत मात्र सरकारने कोणतीही घोषणा केलेली नाही. विविध मागास समाजघटकांच्या रोजगार केंद्रित पशिक्षण कार्यक्रमांसाठी महाज्योती, सारथी, बार्टी वगैरे संस्था राज्यात कार्यरत आहेत. या संस्थांना अर्थसंकल्पात काहीही मिळालेले नाही. तसेच दुर्बल घटकांसाठी विविध महामंडळे स्थापण्यात आली असली, तरी अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी निधीची केवळ हमी देण्यात आली आहे.

मुस्लिम समाजाने लोकसभा निवडणुकीत महायुतीकडे पाठ करून, महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरभरून मते दिली. त्यामुळे मुस्लिमांची नाराजी दूर करण्यासाठी आता मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठी जादा निधी उपलब्ध करून देण्याकरिता कर्जावरील शासकीय हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपयांवर नेण्यात आली आहे. हेच जर ठाकरे सरकारने केले असते, तर मुसलमानांचे लंगुलचालन, अशी टीका फडणवीस यांनी केली असती... मध्य प्रदेशच्या धर्तीवर 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या माध्यमातून २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येणार आहेत. भाजपला महिलांची मते मिळतातच, पण आता आपल्यालाही ती मते मिळावीत, असा शिंदेसेना व अजितदादा गटाचा प्रयत्न आहे. खुद्द अजितदादांनी आपल्या लाडक्या बहिणीच्या विरोधात पत्नीला निवडणुकीत उतरवले आणि तिथे पत्नी पराभूत झाल्यानंतर, पक्षातील इतर कोणाचाही विचार न करता, पत्नी सुनेत्रा पवार यांनाच राज्यसभेवर पाठवले, हा भाग वेगळा. लाडकी बहीण योजना जाहीर होताच, मुख्यमंत्र्यांनी अनेक स्त्रियांकडून ॲडव्हन्समध्ये राखी बांधून घेण्याचा इव्हेंट केला आणि तो चॅनेल्सच्या माध्यमातून सगळीकडे पसरवला... आता राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत देवदर्शन घडवून आणण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' जाहीर करण्यात आली आहे. वास्तविक महाराष्ट्रातील मूलभूत प्रश्न सुटले नसताना, या असल्या सवंग योजना जाहीर करणे पूर्णपणे चुकीचे आहे. तसेच दरवर्षी रोटेशन पद्धतीने पाच ते दहा हजार लोकांना फुकटात देवदर्शन घडवून आणले जाणार आहे. यामध्ये आपल्या वशिलाच्या किंवा गोतावळ्यातल्या लोकांना घुसवण्याचे प्रयत्न होतील.

यावर्षी अद्याप पुरेसा पाऊस झाला नसल्यामुळे शेतकरी काळजीत आहे. एक रुपयात पीक विमा योजना जाहीर झाली असली, तरी अनेक शेतकऱ्यांना त्याचा अजिबात फायदा झाला नसल्याच्या तक्रारी आहेत. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरची करण्याचा निर्धार महायुती सरकारने व्यक्त केला आहे. मात्र राज्यात राजकीय अस्थिरता असल्यामुळे नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. महाराष्ट्र राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल जाहीर झाला असून, त्यामुळे राज्य किती तीव्र संकटात आहे, याची कल्पना येते. केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी ज्याप्रमाणे आर्थिक पाहणी अहवाल मांडला जातो, त्याप्रमाणे राज्यांमध्येही आर्थिक पाहणी अहवाल सादर केला जातो. सरकारला आरसा दाखवण्याचे काम अशा अहवालांमधून होत असते. मुळात सिंचन गैरव्यवहार उघडकीस आल्यापासून, सरकार कोणतेही असो, गेली १३ वर्षे सरकारकडून राज्यात सिंचनाचे निश्चित क्षेत्र किती आहे, याची आकडेवारीच दिली जात नाही. राष्ट्रीय पातळीवर सरासरी ४० टक्के सिंचनक्षेत्र असताना, महाराष्ट्रात मात्र १८ टक्केही क्षेत्र ओलिताखाली आणलेले नाही. जलसंपदा विभागाने प्रसिद्ध केलेल्या श्वेतपत्रिकेत सिंचनक्षेत्र २३ टक्क्यांपर्यंत वाढल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. परंतु ही आकडेवारी वस्तुनिष्ठ नसल्याचा आक्षेप तज्ज्ञांनी घेतला आहे. एकूण सिंचन घोटाळा झाल्यामुळे राज्याचे अपरिमित नुकसान झाले आहे. एकीकडे सुरक्षित सिंचन नाही आणि त्याचवेळी दुसरीकडे पाऊस वारंवार दगा देत असल्याकारणाने कोरडवाहू शेतकऱ्यांच्या अडचणीत भरच पडत आहे. या आर्थिक वर्षात विकासदरातील कृषिक्षेत्राचा हिस्सा फक्त १.९ टक्के होता. त्या आधीच्या वर्षात शेतीक्षेत्राने १०.२ टक्के इतका विकासदर गाठला होता. महाराष्ट्रातील निम्मी लोकसंख्या शेतीवर अवलंबून असली, तरी एकूण उत्पन्नातील शेतीचा वाटा हा १२ टक्केच आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शेतकऱ्यांचा वाढता असंतोष नेमका का होता, ते या परिस्थितीवरून लक्षात येते. तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया आणि ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे २३ टक्के, १० टक्के, २ टक्के आणि १७ टक्के इतकी घट अपेक्षित आहे, ही काळजी करण्यासारखीच बाब आहे. शेतीच्या अवजारांवर १८ टक्के जीएसटी असून, पुरेशी खते मिळत नाहीत आणि बोगस बियाणांचाही सुळसुळाट झाला आहे. दुसरीकडे, दरडोई राज्य उत्पन्नात तेलंगण, कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू आणि गुजरातनंतर महाराष्ट्राचा नंबर लागतो. नुसती औद्योगिक गुंतवणूक वाढून उपयोग नाही, तर अन्य क्षेत्रांचाही विकास झाल्याविना लोकांचे सरासरी उत्पन्न वाढणार कसे? महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढवण्यासाठी १४ ते १५ टक्के गतीने विकासदर गाठावा लागणार आहे. या संदर्भात 'टाटा सन्स'चे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक सल्लागार परिषदेने सरकारला ज्या शिफारसी केल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी होण्याची गरज आहे. काही वर्षांपूर्वी भारताच्या सरासरी आर्थिक विकासवेगापेक्षा महाराष्ट्राचा विकासवेग अधिक होता. आता मात्र, २०२३-२४ या आर्थिक वर्षात तो देशातील विकासदराएवढा, म्हणजे ७.६ टक्के इतकाच असेल, असे भाकित आहे. महाराष्ट्राने देशापुढे आर्थिक विकासाचा नवा आदर्श निर्माण केला पाहिजे, अशी अपेक्षा आहे. त्यासाठी निदान सवंग लोकप्रियता मिळवून देणारे निर्णय घेण्याचा मोह टाळला पाहिजे. मुळात बजेटमधील अनेक योजना प्रत्यक्षात येण्याची शक्यताच कमी आहे. याचे कारण, ऑक्टोबरात निवडणुका होणार आहेत. आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या कमी झाली असून, विद्यार्थीगळतीचे प्रमाण वाढले आहे. हे प्रमाण प्राथमिक शाळांमध्ये शून्यावरून ५ टक्के, माध्यामिक शाळांमध्ये १.५३ टक्क्यांवरून ५.७२ टक्के असे वाढले आहे. आणखी एक चिंतेची बाब म्हणजे, महावितरणच्या वीजहानीमध्ये २०२२-२३च्या तुलनेत वाढच झाली आहे. महावितरणची कार्यक्षमता वाढण्याची नितांत गरज असून, वीजबिलांच्या वसुलीबाबत आनंदी आनंदच आहे. पंतप्रधान आवास योजनेत राज्यात सुमारे १९ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट निर्धारित असले, तरी फक्त आठ लाखांच्या आसपासच घरे बांधून पूर्ण झाली आहेत. 'हे काम करणारे सरकार आहे', असा गजर सतत केला जात असला, तरी अनेक क्षेत्रांत उद्दिष्टपूर्ती बिलकुल झालेली नाही. केवळ प्रसिद्धी आणि इव्हेंटबाजीमुळे लोकांचे प्रश्न सुटत नसतात आणि मतेही मिळत नसतात! मुळात बजेटमधील अनेक योजना प्रत्यक्षात येण्याची शक्यताच कमी आहे. याचे कारण, ऑक्टोबरात निवडणुका होणार असून, त्यापूर्वी आचारसंहिता लागेल. निवडणुका झाल्यानंतर, शिंदे सरकार घरी जाणार, हे नक्की. कल तक रब को भूला था

अब नाम लगा है रटने
जब माल लगा है घटने
लगा कलेजा फटने
तो खैरात लगी है बटने

केवळ विधानसभा निवडणुकांसाठी मते मिळवण्याच्या उद्देशानेच बजेटची रचना केली आहे, अशी टीका शरद पवार यांनी केली आहे. सत्तर रुपये खिशात असताना, शंभर रुपये कसे खर्च करणार, हा त्यांनी केलेला सवाल बिनतोडच आहे!

**(इंडि जर्नल वरून साभार)**

आजकाल

# गरिबांचे काढून घेऊन श्रीमंतांशी धन

संजीव चांदोरकर

बॉटम ऑफ पिरामिड नागरिकांच्या ताटातून वाटा काढून घेऊन टॉप ऑफ पिरॅमिड नागरिकांच्या ताटात घालणे

भारतात वाढत चाललेल्या आर्थिक विषमतेबद्दल ऑक्सफॅम, जागतिक बँकेपासून ते देशांतर्गत संशोधनं संस्थे पर्यन्त सर्वांनी गेली अनेक वर्ष आकडेवारी सहित पुरावे दिले आहेत

तो प्रश्न तर गंभीर आहेच.

इथे आपण दाखवून देत आहोत की अस्तित्वात असलेली नैसर्गिक, पायाभूत, वित्तीय साधन सामग्री ''बॉटम ऑफ पिरॅमिड'' कुटुंबांच्या तोंडातून काढून ती ''टॉप ऑफ बॉटम'' मधील वर्गांकडे वर्ग करण्याचे प्रकार सर्रास घडू लागले आहेत. जे आर्थिक विषमतेच्या मुद्यांपेक्षा काही पटींनी गंभीर आहे.

यांची यादी खूप मोठी आहे. ती काढता येईल. नवनवीन उभा करणे महत्त्वाचे आहे. इथे फक्त तीन उदाहरणे दिली आहेत.

मुंबईमध्ये एसी लोकल्स

त्याच प्रवासाला सेकंड क्लास पेक्षा काही पटीने जास्त पैसे मोजण्याची आर्थिक कुवत असणाऱ्या प्रवाशांना एसी लोकल्स दिल्या तर आपण कोण आपत्ती घेणार. कोणी पैसे असतील तर चार्टर्ड फ्लाईट करेल.

इथे काय होतेय

नॉन एसी लोकल्स ज्याच्यातून ९० टक्के मुंबईतील उपनगरीय प्रवासी प्रवास करतात त्यांना उपलब्ध असणाऱ्या लोकलच्या फेऱ्या मधील वाटा काढून एसी लोकल चालू करण्यात आल्या आहेत.

एसी लोकल्सकडे खूप प्रवासी शिफ्ट झाल्यामुळे नॉन एसी डब्यात आता गर्दी कमी झाली असे देखील नाही. एसी लोकल किती भरेल्लया असतात ते स्वतः येऊन बघा

इसी लोकल्स मधून उपनगरीय वाहतुकीला किती पैसे मिळतात हा दुय्यम मुद्दा आहे

नॉन एसी लोकल्सची उपलब्धता कमी होऊन इतरांचा प्रवास अधिक यातनामय होत असतो हा प्राथमिक मुद्दा आहे

तीच गोष्ट अनेक दीर्घ पल्ल्याच्या गाड्यांची. सेकंड क्लासच्या बोगीज कमी करून त्याऐवजी एसी डब्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. म्हणजे सामान्य नागरीकांना सेवेची उपलब्धताच कमी होणार. त्यातून त्यांच्या यातना वाढणारं

कोट्यावधी गरिबांच्या वाढीव यातनांची रुपयातील किंमत मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्र कधीच काढत नाही

लाखो बॅलन्स पाणी वापरणारे बियर चे कारखाने

बियर वा प्रचंड पाणी लागणारे प्लांट समुद्र किनाऱ्यावर लावावे. या कारखान्यांना लागणारे पाणी त्यांनी देशाबाहेरून मोठ्या टँकर जहाजातून आणावे.

काय होइल बीयर महाग होईल ना. होऊ दे.

(डीस्कलोजर : मी स्वतः बीयर पितो)

पण ज्यावेळी बिअरची कारखाने भूगर्भाअंतर्गत किंवा कालव्याचे पाणी वापरतात त्यावेळी आजूबाजूच्या मोठ्या भूभागातील पाण्याची पातळी कमी जाते कमी होते आणि शेती व तत्सम व जीवनात जीवनावश्यक गरजांसाठी पाण्याची उपलब्धता कमी होते

पुन्हा तोच मुद्दा बियर चे कारखाने १०० पट जास्त पाणीपट्टी कदाचित देत असतील पण मुद्दा उत्पन्नाचा नाही तर पाण्याच्या कमी झालेल्या उपलब्धतेचा आहे

आणि त्यातून वाढलेल्या लाखो कुटुंबांच्या यातनांचा. विहिरीतून पुरेसे पाणी न मिळाल्यामुळे करपलेल्या पिकांचा.

समुद्र किनाऱ्यावर बियर कारखाने, जहाज टँकरने पाणी या फक्त सूचना आहेत. मुद्दा अधोरेखित करण्यासाठी

मुद्दा काय आहे. मुद्दा आहे पिण्याच्या पाण्याचे कोमोडीटीफिकेशन विरोध करण्याचा. त्याचा अर्थ असा की ज्याच्याकडे पैसे असतील त्याने ती कमोडिटी खरेदी करावी

अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. ज्यात ''बॉटम ऑफ पिरॅमिड'' मधील लोकांच्या ताटातून काढून ''टॉप ऑफ पिरॅमिड'' मधील लोकांच्या ताटात वाढले जात आहे. कोण लाभार्थी किती पैसे देतो हा दुय्यम मुद्दा. ते पैसे काय चाटायचे.

त्या त्या वेळची क्षणाची वस्तुमल, सेवांची उपलब्धता सर्वात महत्त्वाची.

लोकसंसद

## आतातरी बुवाबाजी थांबेल काय?

उत्तर प्रदेशातल्या हाथरस या ठिकाणी पार पडलेल्या नारायण साकार हरि उर्फ भोलेबाबांच्या सत्संगात चेंगराचेंगरी होऊन त्यात १२२ जणांचा नाहक बळी गेल्याची आणि अनेक लोक जखमी झाल्याची दुःखद घटना घडली. या दुर्घटनेनंतर सत्संग घडवून आणणाऱ्या भोले बाबाविषयी बरीच माहिती प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध झाली आहे. सूरजपाल जाटव असे या भोलेबाबांचे मूळ नाव आहे. उत्तर प्रदेश पोलीस दलात ते पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. २८ वर्षांपूर्वी एका विनयभंगाच्या प्रकरणात दोषी ठरल्याने त्यांना पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात आले आणि तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगवासाची शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर सूरजपाल जाटव हे भोलेबाबा बनले. अल्पावधीतच सत्संगाच्या नावाखाली त्यांचे अनेक अनुयायी तयार झाले आणि त्यांच्या कार्यक्रमांना हजारोंची गर्दी होण्यास सुरुवात झाली. आता या दुर्घटनेमुळे भोलेबाबाचा सत्य पूर्वेइतिहास समोर आल्याने त्याच्या भक्तांची संख्या आतातरी घटेल काय आणि सत्संगाच्या, अध्यात्माच्या नावाखाली दिवसेंदिवस वाढत चाललेली अंधश्रध्दा, बुवाबाजी थांबेल काय? हाच खरा प्रश्न आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**५ जुलै**

**१८७६ :-** अध्यात्मपर ग्रंथाचे लेखक, अनुवादक ना.वा.गुणाजी यांचा जन्म ९ जुलै १८७६ रोजी झाला. कायद्याची पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी काही काळ वकिली केली. तथापि, अध्यात्माच्या ओढीने ते साहित्याकडे वळले. स्वामी रामतीर्थ, रामकृष्ण परमहंस व रमणहर्षी यांची चरित्रे आणि त्यांनी केलेला उपदेश यावर त्यांनी ग्रंथरचना केली. याशिवाय त्यांनी 'बुकर टी. वॉशिंग्टनच्या आत्मचरित्राचा आत्मोद्धार' व 'माझे व्यापक शिक्षण' अशा दोन खंडात अनुवाद केला. स्वामी सत्यदेवांच्या हिंदीतील पुस्तकावरून 'अमेरिकेतील गरीब विद्यार्थी' हा स्वावलंबनाच्या शिक्षणाची महती सांगणारा अनुवादही त्यांनी केला. श्रीसाईचरित्र, भगवत्गीता यांचाही त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. 'आहे मनोहर तरी' हे त्यांचे आत्मचरित्र गाजले. त्याला अनेक पारितोषिके मिळाली. याशिवाय ''समांतर जीवन या पुस्तकातून फिलिप रोझ यांच्या 'पॅरलल लाईफ' या पुस्तकाचा परिचय तर सोयरे सकळ या पुस्तकातून वसंतराव देशपांडे, कुमार गंधर्व. माधव आचवल, मल्लीकार्जुन मन्सूर यांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहे. चिंतनशिलता व काव्यात्मता हा त्यांच्या लेखनाचा विशेष गुण 'मण्यांची माळ, मनातलं अवकाश, सोयरे सकळ, समांतर जीवन', या त्यांच्या पुस्तकांनी त्यांची साहित्यिक म्हणून स्वतंत्र अशी ओळख निर्माण झाली. 'प्रिय जी. ए.' हा लेखक जी. ए. कुलकर्णी यांना पाठविलेल्या पत्रांचा सग्रंह हे त्यांचे शेवटचे पुस्तक. सामाजिक बांधिलकी जपताना पु. ल. देशापांडे फाऊंडेशनच्या माध्यमातून करोडो रुपयांचा निधी मराठी विज्ञान परिषद, लोकमान्य सेवा संघ, ग्रामायत, मुक्तांगण आदी संस्थांना दिला. यात लाखो रुपये त्यांनी पदरचे घातले, पण याची वाच्यता मात्र त्यांनी कधी केली नाही. कविता हा त्यांचा जीव की प्राण होता. पुलंच्या स्मृतीनिमित्त त्यांनी 'कवितांतली' हा काव्यवाचनाचा खास कार्यक्रम सादर केला होता. अखेरपर्यंत लेखन, वाचनात मग्न असणाऱ्या सुनिताबाई ७ नोव्हेंबर २००९ रोजी निधन पावल्या. त्याचबरोबर सायंटिफिक अँड एफिशियन्ट ब्रीदिंग व अँटी हार्टफेल हार्ट एक्झरसायझिस असे आरोग्यविषयक इंग्रजी ग्रंथही त्यांनी लिहिले. यातून साध्या श्वसनक्रियेने भयंकर रोगावर मात करता येते, याचे विवेचन करून निसर्गोपचाराची महती पटवली आहे. याखेरीज सार्थ भगवद्गीता सर्वांगसुंदर नमन व्यायाम, मनाचे श्लोक, उपनिषदांतील गोष्टी, मुक्तेश्वरी गीता, पंचरत्नगीता इत्यादी थोर ग्रंथही त्यांनी लिहिले आहेत. आपल्या लेखणीद्वारे, संतपुरुषांच्या तत्त्वज्ञानाचा मराठी भाषिकांना परिचय घडवून देणारे गुणाजी ५ जुलै १९६३ रोजी पंचत्वात विलीन झाले. **१९१२:-** लेखक, पत्रकार आणि कथेचे विविध प्रकार मराठीत रूजविणारे दत्तात्रय पांडुरंग खांबेटे यांचा जन्म. चुरचुरीत विनोद आणि राजकीय विषयांवर मर्मवेधक लेखन करण्यात त्यांचा हातखंडा. 'पोहिमा', 'वेडछाप', 'उपहास' आदी कथासंग्रह प्रकाशित. 'भीतीच्या छाया' हा त्यांचा भयकथासंग्रह गाजला. विज्ञानकथा हा प्रकार मराठीत रुजवला तो खांबेटे यांनी. **१९२०:-** कथा-कादंबरीकार आणि संस्.त व पौरोणिक साहित्याचे अभ्यासक आत्माराम नीळकंठ साधले यांचा जन्म. 'हा जय नावाचा इतिहास आहे' हा त्यांचा गाजलेला ललित ग्रंथ. याशिवाय 'आनंदध्वजाच्या कथा' या शृंगारिक वळणाच्या कथा. 'महाराष्ट्र रामायण' हे खंडकाव्य. 'रुक्मिणी स्वयंवर' हा अनुवाद. 'लढाई संपल्यावर' ही कादंबरी, अशी ६० पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. या व्यतिरिक्त त्यांनी बालसाहित्याचीही निर्मिती केली आहे. साधले यांनी विविध विषयांवर विविधांगानी लेखन केले आहे. लेखक म्हणून मात्र ते आनंद साधले या टोपण नावाने नावारुपाला आले. **१९३१:-** लेखक, पेशाने वैद्यकीय व्यवसाय डॉ. दामोदर विष्णू नेने तथा दादूमिया यांचा जन्म. 'दलितस्थान झालेच पाहिजे', 'द्रोपतीची मुलगी' ह्या कादंबऱ्यांसह दलितांचे राजकारण हा ग्रंथ प्रसिध्द तसेच 'एस् विजयानंद भारती' या टोपणनावाने त्यांनी इंग्रजीतूनही ग्रंथ लेखन केले. **१९३३:-** लेखक आणि सूचीकार सुरेंद्र आत्माराम गावस्कर यांचा जन्म. 'हस्तलिखितांची वर्णनात्मक नामावली' ही उपयुक्त अशी सूची त्यांनी तयार केली. **१९४९:-** कवी वसंत कांबळे यांचा जन्म. 'सुगंध गीतमाला' हा गीतसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९५६:-** लेखक आणि कवी ॲड. भगवान बन्सीलाल पाटील यांचा जन्म. पेशाने वकील. यांचा 'न्यायचक्र' हा काव्यसंग्रह आणि 'कायदयाच्या राज्यात आम्ही' व 'विस्तार अधिकार' हे माहितीपर ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. **१९६६:-** योग अभ्यासक आणि या विषयाचे लेखक विनायक श्रीसम देसाई यांचा जन्म. किशोर धामोरीकर यांच्या सहाय्याने 'योग रश्मि' हे पुस्तक लिहिले. याशिवाय 'योग' या विषयावर स्वतंत्र पुस्तक त्यांचे प्रकाशनाच्या मार्गावर आाहे. तसेच या विषयावर विविध वर्तमातपत्रे, मासिके यातून सातत्याने लेखन. **१९७९:-** कवी आनंद वोड यांचा जन्म. 'चूल' या काव्यसंग्रहासह 'ओंजळ','ग्रंथाली','प्रेमसागर' आणि 'शब्दरत्नाकर' हे प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ जुलै

१) श्री. हनुमंत लक्ष्मण पारसनीस चेंढरे, अलिबाग, ५-७-१९३८
२) श्री. नारायण जनार्दन पाटील सारळ, ५-७-१९४१
३) श्री. पांडुरंग बाळकृष्ण राणे कुरूळ, ५-७-१९४७
४) श्रीम. नलिनी वामन तुपे अलिबाग, ५-७-१९५१
५) श्रीम. सुमन सीताराम दोंदे अलिबाग, ५-७-१९३८
६) श्री. जयहिंद अंबाजी म्हात्रे अलिबाग, ५-७-१९५३
७) श्रीम. पुष्पा अशोक पडते नवगाव, ५-७-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखलअसलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# पोलिसांनी दिले कायद्याचे ज्ञान

**। कोलाड । वार्ताहर ।**

**संपूर्ण भारत देशात सोमवार १ जुलै रोजी रात्री १२ वाजल्यापासून नवीन कायद्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्या संदर्भात माहिती देण्यासाठी कोलाड पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या नेतृत्वाखाली कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील, जागरूक नागरिक यांची सोमवारी सायंकाळी सभा घेण्यात आली. या सभेत नवीन कायद्याचे महत्त्व आणि त्याची अंमलबजावणी कशी होणार याबद्दल त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.**



कायदा नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण आहे. या कायद्यामुळे नागरिकांना नवीन अधिकार आणि सुविधा मिळणार आहेत, ज्यामुळे त्यांचा दैनंदिन जीवन अधिक सुरक्षित आणि सुव्यवस्थित होईल. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नागरिकांना काय करावे लागेल, त्यासाठी कोणत्या कागदपत्रांची गरज आहे, आणि त्याचे कायद्यानुसार पालन कसे करावे, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

मोहिते मार्गदर्शन करताना म्हणाले की, इंग्रजांनी आपला एक छत्र शासन करण्यासाठी कायदे बनवले होते. त्यांनी आपल्या मर्जीप्रमाणे पाहिजे तसे तीन वेळा कायद्यांमध्ये बदल केले होते. आत्ता आपल्या देशात राज्याचे आणि केंद्राचे असे दोन प्रकारचे कायदे आहेत. राज्याचे कायदे राज्यात लागू होतात तर केंद्राचे कायदे देशभर लागू होतात. ते पुढे म्हणाले. तसेच गोवंश हत्या कायदा कोणीही हातात घेऊन नये, गोवंश प्रकरणी तुम्हाला काहीही माहिती मिळाली तर पोलिसांना कळवावे. माहिती देणाऱ्यांची नांवे गुप्त ठेवण्यात येतील असेही सांगितले. जेणेकरून गोवंश चोरांचा किंवा गोवंश हत्या करणाऱ्याचा तुमच्यावर डुक राहणार नाही, कारण ते तुमचा घातपात करू शकतात. म्हणून कोणीही याबाबतीत कायदा हातात घेऊ नये.

फार्म हाऊस विविध हॉटेल, बार, वॉटर पार्क या ठिकाणी अमली पदार्थांचा वापर होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत तसेच असे होत असेल तर त्याबाबत पोलीस ठाण्यात माहिती देण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धबधब्यांवर पर्यटकांना सुरक्षितरित्या जाण्याच्या तसेच त्या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडत असल्यास कळवण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना पोलीस नितीन मोहिते व उपनिरीक्षक नरेश पाटील यांनी सविस्तर उत्तरे दिली आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.

यावेळी काँग्रेस तालुका अध्यक्ष हरिओम टाळकुटे, दादा महाबळे, नरेन जाधव, रवींद्र तारू, संजय कुरले, रायगड जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष संतोष दळवी, महेश सानप, योगेश कडेवार, आंबेवाडी सरपंच, उपसरपंच नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# उत्कर्ष मंडळातर्फे विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**। पेण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील हमरापूर भागातील रायगड जिल्हा परिषद मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना श्री गणपती कारखानदार उत्कर्ष मंडळ हमरापुर विभागाचे अध्यक्ष भाई मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले.

हमरापूर प्राथमिक शाळेत वह्या वाटप कार्यक्रमाला हमरापुर गावचे कारखानदार राकेश दाभाडे, खजिनदार संदेश कदम, सल्लागार कुणाल पाटील, हमरापूर अध्यक्ष किरण मांगरुळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका पल्लवी भोईर व शिक्षक तसेच विदयार्थी उपस्थित होते.

जोहे येथे प्राथमिक शाळेत राज्य गणेश मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष अभय म्हात्रे, श्री गणपती कारखानदार उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष भाई मोकल, नितीन मोकल, शंकर मोकळ, राजू पाटील, रविंद्र मोकल, तर सतीश पाटील, कैलास पाटील, राजन पाटील यांच्या हस्ते वह्या वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपून आमच्या संघटनेच्यावतीने एक छोटीशी मदत म्हणून हमरापूर विभागातील प्राथमिक शाळेतील विदयार्थाना वह्या वाटप केल्याचे भाई मोकल यांनी यावेळी बोलताना सांगितले. शाळेच्यावतीने पल्लवी भोईर यांनी सर्वांचे आभार मानले.





## निवारा शेड लोकार्पण कार्यक्रम संपन्न

**। वाघ्रण । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे निवारा शेड लोकार्पण कार्यक्रम ३० जून २०२४ रोजी सपन्न झाला. मूळचे वाघ्रण येथील मौजे पेढांबे येथील रहिवासी सुहास बळीराम धोदरे यांनी आपले वडील कै. बळीराम हिरू धोदरे आणि आई कै. सौ. सुनंदा बळीराम धोदरे यांच्या स्मरणार्थ हि शेड स्वखर्चाने बाधून लोकार्पित केली.

वाघ्रण स्मशानभूमी शेजारी असलेल्या चौथऱ्यावर हि शेड बांधून ग्रामस्थांना अर्पीत करताना फित कापून जनार्दन धोदरे, सुहास धोदरे, उल्हास धोदरे, प्रकाश धोदरे आदींनी शुभारंभ केला.

यावेळी ज्येष्ठ ग्रामस्थ वाय. बी. पाटील यांनी श्रीफळ वाढवून धन्यवाद दिले. या कामात ग्रामस्थ मंडळ व ग्राम पंचायत वाघ्रणचे सहकार्य लाभले. याप्रसंगी माजी सदस्य आणि तटामुक्त गाव समिती उपाध्यक्ष दिपक पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी प्रातिनिधीक श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमात नरेश धोदरे कुटुंब, महिला, बळवंत गावंड, अशोक पाटील, परेश पाटील, यशवंत पाटील, गजेंद्र पाटील, रमेश पाटील, संदेश धुमाळ आदी उपस्थित होते. सुहास धोदरे यांनी संधी दिल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

# एसटी बसला दुचाकीची धडक; १ जखमी

**माणगाव :** भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीची एसटी बसला धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार जखमी होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. सदरील अपघात बुधवार ३ जुलै २०२४ रोजी दुपारी अडिज वाजण्याच्या सुमारास माणगाव तालुक्यातील भागाड गावच्या हद्दीत महाराष्ट्र सिमलेस कंपनीजवळ घडला. या अपघाताची फिर्याद शुभम गणेश गडेकर (वय-२५) एसटी बस चालक रोहा डेपो यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.



अपघाताच्या गुन्ह्यातील आरोपी दुचाकी चालक राजीव रंजन सिन्हा (वय- ४० ) रा.पॉस्को कंपनी विळे भागाड याने त्याच्या ताब्यातील लाल रंगाची ॲक्टिव्हा स्कुटी पुणे बाजूकडून माणगाव बाजूकडे येत असताना विरुद्ध दिशेला येऊन एसटी बसला धडक बसल्याने अपघात घडला. पोलीस तपास करत आहेत.

# विद्यार्थ्यांचा गुणगौरव, साहित्याचे वाटप

## शिक्षणप्रेमी गितराज म्हस्के यांचा स्तुत्य उपक्रम

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा शहरातील हनुमान नगर येथील सन -२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये उत्तमप्रकारे गुण संपादित करून उत्तीर्ण झालेल्या १० वी, १२ वी, पदवीधर यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि शालेय विद्यार्थांना शैक्षणिक साहित्याचे वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

शिक्षणप्रेमी गितराज म्हस्के यांच्या संकल्पनेतून व सहयोगाने संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक सीमा सावंत, आदर्श शिक्षक व पत्रकार नंदकुमार मरवडे, जेष्ठ पत्रकार केशव म्हस्के, कृष्णा शिंदे, रमेश थळे, गोटिराम मालुसरे, दिपक शेडगे, धोंडीबा कदम, विनोद गावडे, प्रज्योती मयेकर, कला पवार, हेमा कांबळे, उमरठकर, लाड, मराठी व्यावसायिक योगिराज म्हस्के, सामाजिक कार्यकर्ते अमित कासट, निखिल शिर्के आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.



२०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये उत्तमप्रकारे गुण संपादित करून उत्तीर्ण झालेल्या १० वी सिध्दी उमरठकर, गौरव खामकर, १२ वी उत्तीर्ण प्रज्वल खामकर, पदवीधर यश केंडे आदी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षण घेत असलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# पनवेल रेल्वे स्थानकात शौचालय सुरू

## शेकाप नेते प्रीतम म्हात्रेंचा यशस्वी पाठपुरावा

**। पनवेल । प्रतिनिधी**

बामणडोंगरी आणि खारकोपर रेल्वे स्टेशन येथील पाण्याच्या कनेक्शन अभावी बंद असलेले शौचालय आज पाणी जोडणी झाल्यामुळे पुन्हा सुरू करण्यात आले. त्यामुळे रेल्वे प्रवाशांना विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळाला आहे. पनवेलचे माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या पाठ पुरायाला यश आले आहे.

गेल्या वर्षभरापासून सिडको आणि रेल्वे प्रशासन यांच्यात बामणडोंगरी आणि खारकोपर रेल्वे स्टेशन येथील सुविधांसंदर्भात फक्त पत्र व्यवहार होत होता. पाण्याची व्यवस्था सुरळीत नसल्यामुळे तेथील शौचालये बंद आहेत. त्याचा त्रास रेल्वे प्रवाशांना सहन करावा लागत होता. हा विषय शेतकरी कामगार पक्षाचे नेते आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांना आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि रेल्वे प्रवाशांनी सांगितला त्यासोबतच इतर समस्या सुद्धा त्यांच्यासमोर मांडल्या होत्या.



त्यावर कार्यवाही म्हणून त्वरित उलवे परिसरातील पाण्याची समस्या आणि इतर सिडकोची अपुरी विकास कामे यासंदर्भात समस्या निवारणासाठी त्यांनी रायगड भवन येथे संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यातून सकारात्मक निर्णय झाले. त्यावर त्यांना त्वरित कार्यवाही करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते.

> वर्षभरापासून सिडको आणि रेल्वे प्रशासन यांच्या पत्रव्यवहारामध्ये अडकलेल्या रेल्वे स्थानकातील शौचालयाच्या पाणी जोडणीचा पाठपुरावा केला. आज काम पूर्ण झाले आहे. पाण्याचा पुरवठा आता सुरु झाला आहे. नागरिकांशी संवाद साधला असता परिसरातील अजूनही बऱ्याच गोष्टी सिडकोकडून होणे अपेक्षित आहे. त्या बाबतही सिडकोला लवकरच निर्णय घेण्यास भाग पाडणार आहे. नागरिकांना त्यांच्या कररूपी भरलेल्या पैशाने नागरीसुविधा मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार.
>
> - प्रीतम जनार्दन म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते, पनवेल महानगरपालिका

# पावसाने दडी मारल्याने शेतीची कामे खोळंबली

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

तालुक्यात आठ जून रोजी पाऊस पडायला सुरुवात झाली होती. परंतु दोन दिवस पाऊस पडल्यानंतर पावसाने पुन्हा एकदा दडी मारली होती. शेतकऱ्यांनी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावरती आपल्या शेतामध्ये भात पेरणी केलेली होती. पहिला पाऊस पडल्यानंतर भाताचा रुजवा चांगल्या प्रमाणात झाला होता. नंतर पाऊस गायब झाल्यामुळे भात रोपे करपून जातात की काय? अशी स्थिती निर्माण झाली होती. परंतु त्यानंतर पावसाने दमदार सुरुवात केली व भात रोपे देखील लावणी योग्य झाली. परंतु मागील चार दिवसापासून पावसाने दडी मारली आहे. दिवसातून एखाद छोटीशी पावसाची सर कोसळते.

त्यामुळे भात लावणीची कामे खोळंबल्याचे पाहायला मिळत आहे. कारण शेतामध्ये भरपूर पाणी व चिखल असल्याशिवाय भात लावणी करता येत नाही. समुद्र खवळलेला असला तरीही नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा जोर कमी असल्याने पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. शुक्रवार ५ जून रोजी अमावस्या आहे. याच दिवशी पुनर्वसू नक्षत्र निघत असून या नक्षत्राचे वाहन हत्ती हे आहे. त्यामुळे अमावस्येपासून तरी पाऊस चांगल्या प्रमाणात लागेल, अशी शेतकऱ्यांना आशा आहे. दरम्यान, पावसाने दडी मारल्याने उष्म्याचे प्रमाण अधिक वाढले आहे.

# आदई डोंगरावर वृक्ष लागवड संपन्न

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

संवेदना निसर्ग सखी ग्रुप ने २ जुलै २०२४ रोजी आदई डोंगरावर जाऊन वृक्षारोपण केले. वेगवेगळ्या देशी झाडांची या वेळी लागवड करण्यात आली. या वर्षीचे विशेष म्हणजे निसर्गाप्रेमी असलेल्या संस्थेबाहेरील महिलांचीही या कामासाठी साथ मिळाली. आता याच ग्रुपने बिज संकलन, उन्हाळ्यात झाडांना पाणी घालायला मदत करणे आदींसाठी सहभागी होण्याचा मानस बोलून दाखवला.

बऱ्याच महिलांना इच्छा असूनही घरातील अडचणीमुळे येणे शक्य होत नाही अशा सर्व महिलांसाठी हा ग्रुप म्हणजेच निसर्गदेवतेच्या सेवेची सुवर्ण संधी होय. किमान शंभर जणांचा सक्षम ग्रुप तयार करण्याचा मानसं आहे. पनवेलजवळ राहणाऱ्या महिलांनी या ग्रुपमध्ये सामील होऊन काम चालू केले तर निश्चितच एक चांगले काम उभे राहू शकते. पनवेलमध्ये कार्यरत अनुभूती संस्था, सिटीझन फोरम संस्थेतर्फे देशी झाडे उपलब्ध करून दिली असल्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## मोठी जुई येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण :** तालुक्यातील मोठीजुई येथील पीएनपीच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना लाईट ऑफ लाईफ या संस्थेच्यावतीने एक डझन वह्या, कंपास पेटी, आलेख वही, चित्रकला वही असे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेसाठी अभ्यासक्रम किट देण्यात आल. याप्रसंगी किशोर भोईर, लाईट ऑफ लाईफ संस्थेचे सदस्य, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# ‘इट प्ले रीड’च्या माध्यमातून योग दिवस साजरा

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

अपर्णा शहा संस्थापित ‘‘ईट प्ले रीड’’ ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली ईट प्ले रीडच्या राजदूतांसह सर्व भावना ग्रुपमधील सहकाऱ्यांनी सोबत येत योग दिवस साजरा केला. जेणेकरुन शरीराला उत्साह आणि एनर्जी मिळावी.




ईट प्ले रीडच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यक्रम राबवले आहेत. अनेकांना मदतीचा हात दिला आहे. इट प्ले रीडचा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे. सकारात्मकतेचा एक लहरी प्रभाव निर्माण करण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यांच्या कार्यामागे एकत्र येऊ आणि प्रत्येकाने अपर्णा शहाच्या यांच्या सर्वांना फायदेशीर ठरणाऱ्या संस्थेला म्हणजेच ‘‘ईट प्ले रीड ला’’ समर्थन करूया, असे आवाहन करण्यात आले आहे. सर्वांनी एकमेकांना योग दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# मुख्यमंत्री माझी बहीण योजनेसाठी कॅम्प

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारने आपल्या अतिरिक्त अर्थ संकल्पात राज्यातील महिलांना मुख्यमंत्री माझी बहीण योजनेमधून दरमहा १५०० रुपयांचे अनुदान देण्याचे निश्चित केले आहे. या योजनेचा लाभ मिळावा यासाठी कर्जत तालुका तहसील कार्यालय तसेच सेवा केंद्र यांच्या कार्यलयानाच्या बाहेर आणि तलाठी कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालये महिलांनी दुमदुमून गेली आहेत.

महिला वर्गाची धावपळ कमी करण्यासाठी राजकीय पक्षांनी शिबिरांचे आयोजन केले आहे. सामाजिक संस्थांच्यावतीने प्रत्येक जिल्हा परिषद गटासाठी तर काही राजकीय पक्षांनी आपल्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत हि सेवा उपलब्ध करून दिली आहे. ५० टक्के महिलांची संख्या लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने देखील अशी योजना महाराष्ट्र राज्यात आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ५० टक्के महिला मतदार यांना अनुदानाचा लाभ देऊन महिलांचा विश्वास निवडणुकीच्या काळात मिळविण्याचा सर्वात मोठा प्रयत्न महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार उचलण्याच्या प्रयत्न करत आहे. त्यासाठी हि योजना जाहीर झाल्यानंतर राज्यातील प्रत्येक तालुका मुख्यालये महिलांच्या गर्दीने भरून गेली आहेत. अशावेळी महिलांची धावपळ तालुका तहसील कार्यालय, तालुक्यातील तलाठी कार्यालये तसेच सेतू केंद्र, सेवा कार्यालये आणि ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर गर्दी दिसून येत आहेत. तालुक्याच्या ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांना दिवसभर ताटकळत राहावे लागत आहे. त्याचवेळी अनेक महिला आपल्या लहान मुलाबाळांना सांभाळत दिवसभर अर्ज भरून घेण्यासाठी थांबावे लागत आहे. या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात गर्दी वाढत आहे. मात्र प्रशासनाकडून विशेष अशा कोणत्याच सुविधा महिलांसाठी देण्यात न आल्याने नाराजीचा सूर आहे.

दरम्यान, तहसिल, सेतु कार्यालयात मोठ्या प्रमाणात अर्ज भरण्यात येत असल्याने दलांलाचे चांगलेच फावत आहे. तसेच लिहानावळ वाले, झेरॉक्स सेंटर यांचा व्यवसाय देखील यामुळे तेजीत आला आहे. पुढील महिनाभर अशीच परिस्थिती कायम राहणार असल्याचे सध्या चित्र दिसत आहे.

# जिंदल रुग्णालयात आरोग्य शिबीर

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीमध्ये येणाऱ्या बी.सी. जिंदल रुग्णालय सुकेळी यांच्यावतीने जिंदल रुग्णालयात शुक्रवार १२ व १९ जुलै रोजी दोन वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ रोजी शरीरातील रक्ताचे प्रमाण, १९ रोजी रक्तातील साखरेचे प्रमाण अशी दोन शिबिर होणार आहेत. या शिबिरांमध्ये नागरीकांची रक्ताची तपासणी करुन योग्य असे मार्गदर्शन डॉ. गोपाळ परमार करणार आहेत.

तसेच जिंदल रुग्णालयाची सेवा ही गोरगरीबांच्या सेवेसाठी २४ तास सुरू करण्यात आली आहे. विविध आजारांवरती खारघर येथील तज्ञ डॉक्टरांच्या भेटी देखील सुरु करण्यात आल्या आहेत. यामध्ये हृदयरोग तज्ञ डॉ.समिर वनकर (प्रत्येक महिन्याचा तिसरा बुधवार), स्त्री रोग तज्ञ डॉ. रोहीणी खेरा भट्ट (महिन्याचा दुसरा चौथा गुरुवार), अस्थिरोग तज्ञ डॉ. शरिफ दुदेकुला (महिन्याचा तिसरा शुक्रवार व चौथा बुधवार), डॉ. नितिश अरोरा (महिन्याचा तिसरा शुक्रवार व चौथा बुधवार), डॉ. आर. जे. गड्डम ( प्रत्येक आठवड्यात बुधवार व शनिवार), मुत्र रोग तज्ञ डॉ. विकास बिशे (महिन्याचा दुसरा बुधवार), बालरोग तज्ञ डॉ. आनंद वागळे. (दर गुरुवारी), दंतरोग तज्ञ डॉ. संकेत म्हात्रे (दर शुक्रवारी), कान,नाक,घसा तज्ञ डॉ. हर्ष गुजराथी (दर शुक्रवार), त्वचारोग तज्ञ डॉ. मंदार माने (दर बुधवारी) आदी डॉक्टरांच्या भेटी जिंदल रुग्णालयात सुरु करण्यात आल्या आहेत.

तरी या सर्व सुविधांचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा व अधिक माहितीसाठी ९७६४२६५४७२ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन रुग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ.गोपाळ परमार यांनी केले आहे.

**निवडक**

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**मुंबई :** विज्ञानलेखनाला प्रोत्साहन तसेच विज्ञान व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा समृध्द करण्याच्या उद्देशाने, मराठी विज्ञान परिषदेतर्फे राज्यस्तरीय विज्ञान निबंध स्पर्धा घेतली जाते. विद्यार्थी गटासाठी (इ. बारावीपर्यंत) विषय 'ई-कचरा' आणि खुल्या गटासाठी 'प्रकाश प्रदूषण' हे विषय आहेत. निबंध स्पर्धेकरिता शब्दमर्यादा १५०० ते २००० इतकी असून अंतिम मुदत ३१ ऑगस्ट आहे. या विनाशुल्क स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी (०२२) ४८२६३७५० किंवा ४८२६००९४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कोमसाप तर्फे कविसंमेलन

**कोर्लई :** कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रोहा, मुरुड, तळा, माणगाव शाखेतर्फे महाकवी कालिदास जयंती निमित्ताने रोह्यातील निवी येथील बयोज फॉर्म येथे रविवारी (दि.७) सकाळी १० वाजता वर्षासहल कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. वर्षा सहल निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष सुधीर, एल.बी.पाटील, अ.वि. जंगम, गणेश कोळी, सुखद राणे, संध्या दिवेकर, संजय गुंजाळ, हेमंत बारटक्के, अजित शेडगे, सिद्धेश लखमदे, विजय दिवकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## ४०० रोपांची लागवड

**उरण :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उरणतर्फे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी 'चला निसर्गाची सेवा करू या, आपले डोंगर हिरवे करू या' या उपक्रमांतर्गत कोमणादेवी ऑक्सिजन पार्क येथे ४०० रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी महावितरण कंपनीचे सर्व आधिकारी वर्ग, कामगारांचे सारडे विकास मंच तसेच कोमणादेवी ऑक्सिजन पार्क सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. या उपक्रमासाठी सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे.

## लावण्या खोळंबल्या

**कोर्लई :** शेतात भाताचे राब तयार झाले असून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही पावसाच्या लहरीपणामुळे मुरुड तालुक्यात बऱ्याच शेतातील लावण्या खोळंबल्या असून शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. राज्यात मान्सून सक्रिय झाला असून पावसाने दमदार हजेरी लावली असली तरी मागील आठवड्यापासून शेतीच्या कामासाठी लगबग सुरू झाली आहे. शेतातील भाताचे राब तयार झाले असून काही ठिकाणी लावण्या सुरू आहेत तर काही ठिकाणी पावसाअभावी लावण्या खोळंबल्या आहेत.

## भात लागवडीचे प्रात्यक्षिक

**खांब :** सांगडे येथील शेतकरी केशव खरिवले यांनी आपल्या भातशेतीमध्ये यांत्रिक पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यावेळी खरिवले यांच्या शेतावर यंत्राच्या साह्याने भात लागवड करण्यात आली. या प्रात्यक्षिकाचे नियोजन तालुका कृषी अधिकारी एम.बी.करे यांनी केले. यावेळी उपविभागीय कृषि अधिकारी कावळे, ए.एस. सुतार, के.डी.दोरूगडे, पी.ए. उबाळे, पी.एस. राक्षीकर, संदेश थळे, मारुती तुपकर, महेश तुपकर, शिवाजी मुटके, संदेश थळे आदी उपस्थित होते.

# एसटीचा 'प्रवासी राजा दिन'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**एसटीच्या विविध बसेसमधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक व बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच, एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी त्यांच्याशी सौजन्याने वागावे, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाते. यासाठी 'प्रवासी राजा दिन' या योजनेचे आयोजन एसटी महामंडळाकडून करण्यात येणार आहे.**



प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने त्यांना गैरसोईचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते या उद्देशाने दि.१५ पासून 'प्रवासी राजा दिन' या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक एसटी आगारात दर सोमवारी व शुक्रवारी या दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. या दिवशी एसटीचे जिल्हा प्रमुख एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या तसेच तक्रारी ऐकून घेतील. त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करतील. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. या अभिनव योजनेत प्रवासी आपल्या समस्या, तक्रारी व सुचना लेखी स्वरूपात दर सोम वारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. तसेच, प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या-त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे.

> या योजनेमुळे प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घेऊन त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करता येतील. यासाठी सर्व प्रवासी बंधू-भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे.
> – डॉ. माधव कुसेकर, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, एसटी महामंडळ

# शिक्षकांच्या समस्यांसंदर्भात चर्चा



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग रायगडच्यावतीने गुरूवारी (दि.४) रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत एक दिवसीय लाक्षणिक उपोषण राजिप प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयासमोर राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र, त्याअगोदर रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या या प्रलंबित समस्यांसंदर्भात चर्चा करण्यासाठी सोमवारी (दि.१) शिक्षण अधिकारी प्राथमिक रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांनी शिक्षक परिषद पदाधिकारी यांना बोलाविले होते. त्याप्रमाणे राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा रायगडच्या पदाधिकारी यांनी रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, प्रशासन अधिकारी कवीतके, कनिष्ठ प्रशासन अधिकारी जाधव, राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे, जिल्हा अध्यक्ष विजय पवार, गजानन देवकर, उदय गायकवाडे, जगदिश चवरकर, सुशील वाघमारे, वैभव पिंगळे, राजू नाईक, देवानंद गोगर, सचिन खोपडे, सुनिल साळवी, महेंद्र गायकवाड, बाळासाहेब बारगजे, विजय मेस्त्री आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अडसूळे यांचा सेवापूर्ती समारंभ



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

कांढरोली येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुरेश गंगाराम अडसुळे यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ खालापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ व खालापूर केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानाने संपन्न झाला. सुरेश अडसुळे यांना बेणसे सिद्धार्थ नगर येथील ग्रामस्थांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मुख्याध्यापक सुरेश अडसुळे यांनी शिक्षण क्षेत्रातील ३८ वर्ष सचोटीच्या सेवेनंतर या सेवेतून निवृत्त होत आहेत. त्यांनी आजवर अनेक आदर्श विद्यार्थी नागरिक घडविण्याचे काम केले आहे. त्या निमित्ताने शिक्षक परिवाराच्यावतीने त्यांचा सेवापूर्ती सत्कारसमारंभ आयोजन करण्यात आला. यावेळी वरिष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास, केंद्रप्रमुख नंदा मोहिते, तालुका प्राथमिक शिक्षक संघ अध्यक्ष संदीप जाधव, सरचिटणीस दिपक पालकर, जिल्हा उपाध्यक्ष हेमंत म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन कडू, संतोष पाटील, उमेश विचारे, विठ्ठल देशमुख, मारुती दासरे, अंजली विचारे, धनाजी थिटे, अनिता चव्हाण, दिपाली कांबळे, वंदना कदम, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हॉटेलमध्ये उत्तम करियरची संधी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

बारावी झाल्यानंतर पुढे काय, हा प्रश्न सर्वांनाच पडत असतो. परंतु, ज्यांचा मनासारखा निकाल आला नाही, वर्ष वाया घालवायचे नाही, उच्च शिक्षणासाठी बाहेर जाता येत नाही किंवा ज्यांना पुढचे शिक्षण घ्यायचे नाही पण स्वप्न खूप मोठी आहेत. अशा अनेक विद्यार्थ्यांसाठी उत्तम करियरची संधी उपलब्ध होत आहे. ज्यांना स्वतःचे काही हॉटेल, रेस्टॉरंट, होम स्टे सुरू करायचे असेल त्यांना आता अलिबाग सोडून बाहेर जायला नको. यासाठी अलिबागमध्ये ज्ञानवर्धिनी एज्युकेशनल ट्रस्ट गेली पंधरा वर्ष क्वालिटी एज्युकेशन देत आहे. यासाठी मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट हे हॉटेल मॅनेजमेंटचे वेगवेगळे डिप्लोमा कोर्स उपलब्ध करून देत आहे. तसेच पुणे, मुंबई च्या तुलनेत अत्यंत माफक फी मध्ये हे कोर्स उपलब्ध करण्यात आले आहेत.

## पनवेल-सायन रस्त्याची दुरवस्था




● पनवेल-सायन या महार्गावरील कामोठे येथील नौपाडा रस्यावर मोठा खड्डा पडल्याने वाहन चालकांना खड्डा चुकवण्याची स्पर्धा करावी लागत आहे. तसेच, या खड्डात अनेक दुचाकीस्वार थोडक्यात बचावले आहेत.

## दोन दिवसांचे विशेष शिबीर

**। म्हसळा । वार्ताहर ।**

महिला व बालकल्याण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या लेखी आदेशानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत भरावयाच्या अर्जाबरोबर लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता वेळेवर व्हावी आणि जास्तीत जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने म्हसळा तहसीलदार समीर घारे यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा तहसीलदार कार्यालय येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला नायब तहसीलदार विठ्ठल राठोड, गटविकास एम. के. जाधव, तलाठी, ग्रामसेवक, एकात्मिक ग्राम विकास प्रकल्प अधिकारी कळबासकर आदि सहभागी झाले होते. दि. ६ आणि ७ जुलै रोजी पंचायतसमिती म्हसळा येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन घारे यांनी केले.

# रायगडच्या सुकन्येची उंच भरारी

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**



जिद्द, मेहनत व चिकाटी या जोरावर श्रीवर्धन तालुक्यातील बागमांडला या छोट्याश्या गावातील तरुणी सोनाली निनाद इडेकर हिने मेकअप आर्टिस्ट म्हणून मोठे नावलौकिक मिळविले आहे. मेकअप आर्टिस्ट, साडी ड्रेपिस्ट, हेअर स्टायलिस्ट, या कामात तिचा हातखंडा आहे. आत्तापर्यत तिने अनेक दिग्गज कलाकारांचा मेकओवर केला आहे. ही कला इतरही महिलांनी आत्मसात करून स्वतःच्या पायावर उभे रहावे यासाठी सोनाली काही दिवसांत सोनालीज् मेकओवर मास्टर क्लासेस सुरु करणार आहे. त्याद्वारे अनेक तरुणी व महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

## आमटेम येथे वृक्षारोपण

**। पेण । प्रतिनिधी ।**

केंद्रशाळा आमटेम येथे शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत व वनविभाग निगडे यांच्या संयुक्त विद्यमानाने १ ते ७ जुलै हा वृक्षारोपण सप्ताह निमित्ताने सरपंच लक्ष्मण तांबोळी, जनार्दन तांबोळी, रवी, वृषाली, अस्मिता, रामफळ त्याचबरोबर ग्रामसेविका मालती पाडगे, वनविभागाचे अधिकारी वारगे, भोईर व पेडवी, मुख्याध्यापिका अनिता वावेकर, सुजाता म्हात्रे, नंदिनी पाटील, भाग्यश्री म्हात्रे, प्रतिभा कपाळे, महेंद्र पाटील व सर्व विद्यार्थी यांच्या सहकार्याने वृक्षारोपणचा कार्यक्रम मोठ्या आनंदात व उत्साहात संपन्न झाला.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक

### ■ बहुजन विद्यार्थी संघटना आक्रमक

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

मुंबई विद्यापीठांतर्गत येणारे जवळपास सर्वच महाविद्यालये मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून संपूर्ण प्रवेश शुल्क घेत असल्याचे चित्र यावर्षीच्या प्रवेश प्रक्रिये वेळी दिसून येत आहे. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंना याबद्दल काही सोयरसुतक राहिलेले नाही, त्यांनी बघ्याची भूमिका घेतली असून महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय विभाग डोळे झाकून बघत असल्याचा आरोप बहुजन विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांनी केला आहे.

मुंबई विद्यापीठांतर्गत येणारी सर्वच कला, वाणिज्य, विज्ञान, व्यावसायिक महाविद्यालये, इंजिनिअरिंग, फार्मसी, विधी महाविद्यालये ही मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून प्रवेशा वेळीच संपूर्ण शुल्क आकारित असल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. वास्तविकता मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मागास प्रवर्गातील अनुसूचित जाती - जमाती, विमुक्त भटक्या जातीच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशा वेळी १२० रुपये शुल्क आकारून प्रवेश देण्याचे आदेश महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांना देण्यात आले होत. मुंबई विद्यापीठाने सुद्धा सन २००४ पासून स्वतंत्र परिपत्रक काढून महाविद्याल यांनी अंमलबजावणी करावी, असा आदेश पारित केला आहे. हाच आदेश आजही मुंबई विद्यापीठातील संपूर्ण महाविद्यालयांना लागू आहे. मुंबई विद्यापिठाच्या अंतर्गत येणारे नवी मुंबई, विद्याविहार, ठाणे, घाटकोपर, भिवंडी, खोपोली, कुडूस वाडा, वाडा, कल्याण, ठाणे येथील महाविद्यालयांत वार्षिक शुल्कासहित अतिरिक्त शुल्क बऱ्याच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून घेत असल्याचा आरोप अनिल वाणी यांनी केला असून मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंचे नियंत्रण या महाविद्यालयांवरती नसल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी पैशाअभावी गुणवत्ता यादीत नाव येऊन सुद्धा प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यामुळे दरवर्षी साधारण २० टक्के मागासवर्गीय विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित राहत असल्याचाही आरोप त्यांनी यावेळी केला आहे.

# विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

फडके विद्यालयातील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शाळेच्या सभागृहात संपन्न झाला. शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सोहळ्याला महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य डॉ. राजीव हजरनीस, केदार तापीकर, सुबोध भिडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रमेश चव्हाण यानी मार्गदर्शन करताना म्हणाले की, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यातील सुसंवादामुळेच यश मिळते. विद्यार्थ्यांनी नैतिक मूल्ये जपावी. विद्यार्थ्यांचे यश हे शिक्षकांच्या प्रयत्नांचे यश असते. यावेळी त्यांनी आपले शिक्षण क्षेत्रातील अनुभव व स्वतःच्या शालेय जीवनातील प्रेरक प्रसंग सांगितले. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली. नी संस्थेच्या समुपदेशन क्षेत्रात सुरू असलेल्या कार्याचे कौतुक केले.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८

● पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग

● Require Fresher/Experienced Civli engineers for Alibaug Project. Email CV to projects@parthinfraalibaug.com 9922768626 https://parthinfraalibaug.com

● Wanted : Teachers, Office Assistants and Typists. Contact: Sindhu Teacher's Classes, 2nd Floor, Vishnu Mandir, Opposite Old Municipal Office, Alibag. Phone Numbers: 9422383196,8551042000, 8551052000.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## स्थानिकांना पावसाळी रोजगाराची संधी

# पर्यटकांना फेसाळ धबधब्याची ओढ

**। तळा । वार्ताहर ।**

**पावसाच्या दमदार आगमनानंतर तळा तालुक्यातील विहीरी, नद्या, धरणे, तलाव तुडूंब भरले असून पर्यटकांना वावे येथील फेसाळ पाण्याच्या धबधब्याची ओढ लागली आहे. तळा तालुका डोंगराळ निसर्ग सौंदर्याने नटलेला असल्याने येथील पावसाळी धबधबे पर्यटकांना आकर्षित करत असतात. तसेच, स्थानिकांना रोजगारची संधी ही उपलब्ध होत आहे.**



मुंबई-गोवा महामार्गावर इंदापूर पासून पश्चिमेला तळा शहराकडे येताना १२ की.मी. अंतरावर वावे धबधबा लागतो. यावर्षी पावसाने सुरुवातीपासूनच मुसळधार कोसळत असून तळा तालुक्याला झोडपले आहे. त्यामुळे तालुक्यातील नदया, तलावं, विहिरी तसेच धबधबे तुडूंब भरून वाहत असून येथील फेसाळयुक्त पाण्याचा धबधबा पर्यटकांना खुणावू लागला आहे. जोरदार पावसामुळे वावे धबधबा पांढऱ्याशुभ्र फेसाळयुक्त रंगात धो-धो वाहत आहे. वावे धबधब्याच्या आजूबाजूला हिरवेगार मनमोहक निसर्गाने हिरवी शाल पांघरलेली दृश्य पहायला मिळतात. तसेच, पक्ष्यांच्या वेगवेगळ्या स्वरांचा किलबिलाट, बहरलेली वृक्षवल्ली, वावे धबधब्यातील पाण्याचा खळखळाट या आवाजांमुळे पर्यटक देहभान हरपून आनंद लुटत असतात. सुरक्षेच्या दृष्टीने धबधबा उत्तम असल्याने दरवर्षी मुंबई, पुण्यापासून हजारो पर्यटक या धबधब्याला भेट देत असतात.

या धबधब्यावर कोणत्याही प्रकारचा धोका नसल्याने अनेक पालक आपल्या पाल्ल्यांसह भिजण्याचा आनंद घेण्यासाठी येत असतात. फेसाळलेल्या पाण्यात मनसोक्त भिजण्यासाठी तरुणाई या धबधब्याकडे वळली जाते. मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे हा धबधबा वेगाने वाहू लागला असून शनिवार, रविवारी सुट्टी असल्याने या ठिकाणी पर्यटकांची प्रचंड गर्दी पहावयास मिळत आहे. या धबधब्याच्या जवळच वावे गाव असल्याने पर्यटकांना चुलीवरच्या भाकऱ्या, शाकाहारी, मांसाहारी जेवण ऑर्डर प्रमाणे बनवून मिळते. यामुळे वावे येथील धबधबा पर्यटकांचे आकर्षण बनले असून येथील स्थनिकांना पावसाळी रोजगाराची संधी उपलब्ध झालेली आहे.



# मरिन ड्राईव्हवर चाहत्यांचा महापुर

## भारतीय संघाचे जल्लोषात स्वागत

**ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार**

या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी मरीन ड्राइव्ह ते वानखेडेपर्यंत एक तीळही ठेवायला जागा उरली नव्हती. भारतीय संघ १७ वर्षांनंतर टी-२० चॅम्पियन बनला आहे. तत्पूर्वी गुरुवारी भारतीय संघ एका विशेष विमानाने दिल्ली विमानतळावर पोहोचला. कडक सुरक्षा आणि पावसाच्या दरम्यान टीम इंडियाच्या स्वागतासाठी चाहते सकाळपासून विमानतळावर उपस्थित होते.

विमानतळावर पोहोचल्यानंतर रोहित शर्मा आणि कंपनीचे जोरदार स्वागत करण्यात आले. यानंतर भारतीय संघ दिल्लीतील मौर्या हॉटेलमध्ये पोहोचला. भारतीय संघाने मौर्या हॉटेलमध्ये खास केकही कापला. हॉटेलमध्ये पोहोचल्यानंतर भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मासह सूर्यकुमार यादव, अर्शदीप सिंग, हार्दिक पांड्या ढोलाच्या तालावर नाचताना दिसले.

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही. तब्बल १३५ कोटी जनतेचे स्वप्न रोहित शर्माच्या नेतृत्वातील संघाने पूर्ण केले. या विजयाचे सेलिब्रेशन देशभर सुरु असताना अवघ्या जगाच्या नजरा मात्र देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईवर होते. विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी मरीन ड्राईव्हवर चाहत्यांचा महापुर लोटला होता. भारतीय संघाची मिरवणूक ओपन बसमधून काढण्यात आली. त्यानंतर वानखेडे स्टेडीयमवर विजयोत्सव साजरा करण्यात आला.

२००७ नंतर प्रथमच मुंबई पुन्हा ठप्प झाली आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ वर्ल्ड चॅम्पियन म्हणून देशात परतला आहे. पंतप्रधान मोदींची भेट घेतल्यानंतर टीम दिल्लीहून मुंबईला रवाना झाली. बीसीसीआयने नरिमन पॉइंट ते वानखेडेपर्यंत १ किमीच्या विजय परेडची व्यवस्था केली होती. यावेळी मरीन ड्राइव्हवर जमलेल्या लाखो चाहत्यांनी खेळाडूंच्या विजयी घोषणा दिल्या. मुंबई क्रिकेट असोसिएशनने गुरुवारी संध्याकाळी भारताच्या २० विश्वचषक विजय परेडसाठी वानखेडे स्टेडियमवर चाहत्यांना विनामूल्य प्रवेशाची परवानगी दिली होती.

दरम्यान, जगज्जेत्या भारतीय क्रिकेट संघाच्या स्वागतासाठी मुंबईतील गर्दी पाहून भारत आणि महाराष्ट्रातील जनतेचं क्रिकेटवर किती प्रेम आहे? याचा प्रत्यय गुरुवारी मुंबईतील गर्दी पाहिल्यानंतर आला.

### टीम इंडियाला वॉटर सॅल्यूट मिळाला

टीम इंडियाच्या विस्तारा फ्लाइट '१८४५' ला मुंबई विमानतळावर उतरल्यानंतर वॉटर सॅल्यूट देण्यात आला. अग्निशमन दलाच्या दोन गाड्या विमानाच्या दोन्ही बाजूला उभ्या राहिल्या आणि पाण्याचा फवारा मारला. विमानतळाबाहेरही चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सर्वजण आपल्या आवडत्या क्रिकेटपटूची आतुरतेने वाट पाहत आहेत.

### रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करुन दिला

मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरात क्रिकेट चाहत्यांनी मोठी गर्दी केल्यामुळे संपूर्ण रस्ता बंद झाला होता. जमलेल्या क्रिकेट चाहत्यांनी प्रचंड गर्दीतून एका रुग्णवाहिकेला जाण्यासाठी रस्ता मोकळा करुन दिला. भारतीय संघाच्या स्वागतासाठी मुंबईतील मरीन ड्राईव्हवर एवढ्या मोठ्या गर्दीमधूनही रुग्णवाहिकेला जाण्यासाठी काही सेकंदात रस्ता मोकळा करून दिल्यामुळे अनेकांकडून कौतुकही करण्यात येत आहे.

# 'एक पौधा एक संकल्प' कार्यक्रम

## ■ झुंझार युवक मंडळ पोयनाडचा उपक्रम

**। रायगड/पोयनाड । प्रतिनिधी।**

पोयनाड येथील झुंझार युवक मंडळाच्या वतीने झुंझारच्या क्रीडांगण परिसरात गुरुवारी (दि.४) 'एक पौधा एक संकल्प' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध असलेल्या माणुसकी प्रतिष्ठान या संस्थेकडून मंडळाला मोफत विविध रोपे देण्यात आली. या रोपांचे पोयनाडच्या मैदानालगत व परिसरातील मोकळ्या जागेत लागवड करून त्यांचे सुरक्षित



संगोपन करण्याचा संकल्प यावेळी मंडळाच्या प्रत्येक सदस्य, खेळाडू यांनी केला. या कार्यक्रमासाठी अन्वर बुराण, महेश निकम, सूर्यकांत विधाते, किशोर तावडे, दिपक साळवी, अनंत राऊत, अजय टेमकर, अ‍ॅड.पंकज पंडित, राजेंद्र जाधव उपस्थित होते.

# रोहितच्या हातात ट्रॉफी नव्हे रिप्लिका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन विश्वविजेता संघ मुंबईकडे जल्लोषासाठी रवाना झाला आहे. रोहित शर्मा आणि द्रविडने मोदींच्या हातात ट्रॉफी ठेवली. रोहित वेस्ट इंडिजहून घेऊन आलेली ट्रॉफी ही प्लॅटीनमची नाही तर चांदीची आहे. वर्ल्डकपची ट्रॉफीतर सोन्याची असते. मग भारतीय संघाला सिल्व्हर रंगाची ट्रॉफी का दिली गेली? असा प्रश्न अनेकांच्या मनात असेल. अनेकांना



वाटले असेल ती व्हाईट गोल्डची आहे. परंतु नाही ती ट्रॉफी व्हाईट गोल्डची नाही. ती चांदीचीच आहे. मग सोन्याची आणि चांदीची ट्रॉफी कधी दिली जाते? मुख्य वर्ल्डकप असेल तेव्हा सोन्या, चांदीची ट्रॉफी विजेत्या संघाला दिली जाते.

# भारतीय टीमने घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने २०२४ च्या टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावल्यानंतर भारतीय संघ दिल्लीत दाखल झाला. टी-२० विश्वचषकाच्या स्पर्धेतील विजयानंतर भारतीय संघाचे आज दिल्लीत जोरदार स्वागत करण्यात आले.

यावेळी दिल्ली विमानतळावर क्रिकेटच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. यानंतर भारतीय संघाने दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी दाखल होत पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. जवळपास एक ते दीड तास पंतप्रधान मोदी



यांनी भारतीय संघाबरोबर संवाद साधला आहे.

भारतीय संघाने २९ जून रोजी झालेल्या विजेतेपदाच्या लढतीत दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव केला होता. १७ वर्षांनंतर भारताने टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले आहे. संपूर्ण भारतात मोठा जल्लोष साजरा करण्यात येत आहे. आता संघ भारतात दाखल झाल्यानंतर आधी दिल्लीत त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं.

## गुजरातच्या बसवरुन राजकारण तापले

**मुंबई :** भारतीय संघाच्या या मिरवणुकीपूर्वीच राज्याच्या राजकारणात मोठ्या वादाला तोंड फुटलं आहे. भारतीयं संघाची मिरवणूक काढण्यासाठी गुजरातमधून बस आणण्यात आली असून, गुजरातधार्जिण्या राज्य सरकारनं भारतीय संघाच्या स्वागतासाठी गुजरातमधून बस आणून महाराष्ट्राचा अपमान केला आहे, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

# धोनी, साक्षीनं साजरा केला लग्नाचा वाढदिवस

**मुंबई :** भारतीय संघाचे पूर्व कर्णधार महेंद्रसिंह धोनी आणि त्यांची पत्नी साक्षी सिंह यांनी त्यांच्या लग्नाचा १५ वा वाढदिवस साजरा केला. अगदी साध्या पद्धतीने साजरा करत माही अन् साक्षी यांनी केक कापून एकमेकांना भरवला. ज्याचा व्हिडियो सोशल मिडियीवर चांगलाच



व्हायरल होताना पाहायला मिळत आहे. माही आणि साक्षी यांच्या या खास दिनी चाहते देखील आपल्या-आपल्या अंदाजात शुभेच्छा देत आहेतया जोडप्यांचा हा व्हिडियो चाहत्यांना मात्र चांगलाच आवडला असून ते प्रेमाचा वर्षाव करीत आहेत तर वेगवेगळ्या प्रतिक्रिया देखील देत आहेत.

# कोको गॉफची आगेकूच

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेची दुसऱ्या मानांकित कोको गॉफने आपली लय कायम राखताना विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत धडक मारली. यासह महिला एकेरीत ओन्स जाबेउर व अग्रमानांकित इगा श्वीऑटेकनेही पुढची फेरी गाठली. पुरुष एकेरीत स्टेफानोस त्सित्सिपास, कार्लोस अल्कराझ, मेदवेदेवने पुढच्या फेरीतील आपले स्थान निश्चित केले. महिला एकेरीत गॉफने आपल्या दुसऱ्या सामन्यात रोमानियाच्या एन्का टोडोनीला पराभूत केले. सामन्याच्या सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत गॉफने टोडोनीला पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. पोलंडच्या श्वीऑटेकनेही अमेरिकेच्या सोफिआ



केनिनला नमवत आगेकूच केली. ट्युनिशियाच्या जाबेउरने जपानच्या मोयुका उचिजिमावर विजय नोंदवला. पुरुष एकेरीच्या सामन्यात स्पेनच्या तिसऱ्या मानांकित कार्लोस अल्कराझने ऑस्ट्रेलियाच्या अलेक्सांदर वुकिचला नमवले. तर, डॅनिल मेदवेदेवने फ्रान्सच्या अ‍ॅलेक्झाडर म्युलेरवर विजय मिळवला.

# भारत-पाकिस्तान सामना १ मार्चला होणार?

**। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।**

भारत विरूद्ध पाकिस्तानचा सामना हा क्रिकेट विश्वातील एक हायव्होल्टेज सामना असतो. आयसीसी टूर्नामेंटमध्ये एकदा वगळता टीम इंडियाने प्रत्येक वेळी पाकिस्तानला नमवले आहे. अलीकडेच, टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ६ धावांनी पराभव केला. दरम्यान, या दोन्ही संघांमध्ये पुन्हा एकदा ही मोठी लढत पाहायला मिळणार आहे. पुढील वर्षी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील सामन्याबाबत पीसीबीने वेळापत्रक तयार केले असून भारत पाकिस्तान सामन्याची तारीखही निश्चित केली आहे.

पीसीबीच्या म्हणण्यानुसार, ही स्पर्धा १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत होणार आहे. १० मार्च हा राखीव दिवस आहे. म्हणजेच अंतिम फेरीसाठी आणखी एक दिवस ठेवण्यात आला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्वी यांना टी-२० विश्वचषक फायनलसाठी बार्बाडोसमध्ये येण्याचे निमंत्रण दिले होते. पीटीआयच्या रिपोर्टनुसार, त्यांनी १५ सामन्यांचे वेळापत्रक आयसीसी समोर सादर केले आहे.

### भारत-पाकिस्तान एकाच गटात

भारताचे उपांत्य फेरीसह सर्व सामने लाहोरमध्ये होणार आहेत. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी दोन गट करण्यात आले आहेत. भारत आणि पाकिस्तानला अ गटात ठेवण्यात आले आहे. या दोन संघांशिवाय बांगलादेश आणि न्यूझीलंड हे संघही आहेत. ब गटात ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश आहे. अलीकडेच, आयसीसीचे इव्हेंट प्रमुख ख्रिस टेटली यांनी इस्लामाबादमध्ये चेअरमन मोहसिन नक्वी यांची भेट घेतली.

### पाकिस्तानमध्ये होणार चॅम्पियन्स ट्रॉफी

पाकिस्तान क्रिकेट बोर्डने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या वेळापत्रकाचा मसुदा तयार केला आहे आणि तो आयसीसीला सादर केला आहे. यावेळी पाकिस्तानला चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद मिळाले आहे. पीसीबीने या वेळापत्रकात १ मार्च २०२५ रोजी लाहोरमध्ये कट्टर प्रतिस्पर्धी भारताविरुद्धचा चॅम्पियन्स ट्रॉफी सामना निश्चित केला आहे. मात्र, त्यात सहभागी होण्यासाठी आणि टीम इंडियाला पाकिस्तानात पाठवण्यास बीसीसीआयने अद्याप संमती दिलेली नाही.

# चार्टर्ड फ्लाइटबाबत अहवाल मागवला



**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

हवाई वाहतूक नियामक ने बार्बाडोसमध्ये अडकलेल्या भारतीय संघाला घेऊन जाणाऱ्या एअर इंडियाच्या चार्टर्ड फ्लाइटबाबत एअर इंडियाकडून अहवाल मागवला आहे. वास्तविक, असा अहवाल समोर आला आहे की, हे विमान नेवार्क, न्यू जर्सी, अमेरिकेहून दिल्लीला जाणार होते, पण ते बार्बाडोसला पाठवण्यात आले. त्यामुळे नेवार्क विमानतळावरील प्रवाशांचे हाल झाले.

२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय संघ बेरील वादळामुळे बार्बाडोसमध्ये ३ दिवस अडकला होता. एअर इंडियाच्या चॅम्पियन्स २४ वर्ल्ड कप (२४) चार्टर्ड फ्लाइटद्वारे संघाला परत आणले जात आहे. गुरुवारी पहाटे ५ ते ६ या वेळेत ही टीम नवी दिल्लीला पोहोचली.भारतीय संघ ३ जुलै रोजी स्थानिक वेळेनुसार दुपारी १.१३ वाजता चार्टर्ड विमानात चढला.एअर इंडियाचा दावा- आम्ही प्रवाशांना एक दिवस आधी माहिती दिली होती. याबाबत एअर इंडियाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, बोईंग ७७७ विमान बार्बाडोसला पाठवल्यामुळे प्रवाशांची कोणतीही गैरसोय झाली नाही. २ जुलै रोजी नेवार्क ते दिल्ली फ्लाइटसाठी तिकिट बुक केलेल्या बहुतेक प्रवाशांना आगाऊ माहिती देण्यात आली होती.

अधिकाऱ्याने सांगितले की, काही प्रवाशांना ज्यांना फ्लाइट रद्द झाल्याची माहिती देण्यात आली नव्हती ते विमानतळावर पोहोचले आणि त्यांना रस्त्याने न्यूयॉर्कला नेण्यात आले. त्या प्रवाशांना न्यूयॉर्क ते दिल्लीच्या फ्लाइटमध्ये अ‍ॅडजस्ट करण्यात आले.

जसप्रीत बुमराहची पत्नी आणि आयसीसी प्रेझेंटर संजना गणेशनने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर हा व्हिडिओ शेअर केला.भारतीय संघ सोमवारी भारतात पोहोचण्यासाठी न्यूयॉर्कला जाणार होता, मात्र खराब हवामानामुळे संघाचे वेळापत्रक विस्कळीत झाले. अहवालात म्हटले आहे की, बेरील चक्रीवादळ अटलांटिकमध्ये येत असल्याने ताशी २१० किमी वेगाने वारे वाहत होते. हे श्रेणी ४ वादळ बार्बाडोसच्या पूर्व-आग्नेय पूर्वेला अंदाजे ५७० किमी अंतरावर होते.

# तुर्कस्तान सोळा वर्षांनंतर उपांत्यपूर्व फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

'लायपझिग - बचावपटू मेरिह डेमिराल याने एकोणीस वर्षीय आर्दा ग्युलेर याच्या भन्नाट कॉर्नर किकवर नोंदविलेल्या दोन शानदार गोलच्या बळावर तुर्कस्तानने सोळा वर्षांनंतर युरो करंडक फुटबॉल स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. त्यांनी झुंजार ऑस्ट्रियास राऊंड ऑफ १६ फेरीत २-१ फरकाने हरविले.

डेमिराल याने पहिल्याच मिनिटास (५७ सेकंद) केलेला गोल युरो करंडकातील दुसऱ्या क्रमांकाचा, तर बाद फेरीतील सर्वांत वेगवान गोल ठरला. नंतर ५९व्या मिनिटास २६ वर्षीय सेंट्रल डिफेंडर डेमिराल याने हेडिंगद्वारे आणखी एक गोल नोंदविला. बदली खेळाडू मिखायल ग्रेगोरिच याने ६६व्या मिनिटास ऑस्ट्रियाची पिछाडी एका गोलने कमी केली.सामन्याच्या भरपाई वेळेत (९०+५ मिनिट) ऑस्ट्रियाने जवळपास बरोबरी साधली होती, मात्र तुर्कस्तानचा ३५ वर्षीय गोलरक्षक मेर्त ग्युनोक याच्या अचाट गोलरक्षणामुळे ख्रिस्तोफ बाऊमगार्टनर याने अगदी जवळून साधलेले हेडिंग विफल ठरले.येथेच २००८ नंतर तुर्कस्तानची आठ संघांची फेरी निश्चित झाली. निलंबनामुळे तुर्कस्तानचा नियमित कर्णधार हाकान चाल्हानोग्लू या लढतीत खेळू शकला नाही. स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आता तुर्कस्तानसमोर नेदरलँड्सचे आव्हान असेल.

म्युनिक येथे झालेल्या आणखी एका राऊंड ऑफ १६ लढतीत नेदरलँड्सने रुमानियाला ३-० असे हरवून २००८ नंतर प्रथमच उपांत्यपूर्व फेरी गाठली. सामन्याच्या विसाव्या मिनिटास कॉडी गॅक्पो याने केलेल्या गोलमुळे डच संघाला आघाडी मिळाली.

गॅक्पो याचा हा यावेळच्या स्पर्धेतील तिसरा गोल ठरला. ६३ व्या मिनिटास गॅक्पो याचा आणखी एक गोल व्हीएआरद्वारे अवैध ठरला. नंतर बदली खेळाडू डॉनियल मालेन याच्या दोन गोलमुळे नेदरलँड्सच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. त्याने अनुक्रमे ८३व्या व ९०+३व्या मिनिटास गोल नोंदवून डच संघाला सोळा वर्षांनंतर उपांत्यपूर्व फेरी गाठून दिली.

## फोगनिनीने रुडला हरवले

**नवी दिल्ली :** विम्बल्डन २०२४ च्या दुसऱ्या फेरीत इटलीच्या फॅबियो फोगनिनीने नॉर्वेच्या कॅस्पर रुडचा पराभव केला. फोगनिनीने हा सामना चार सेटमध्ये जिंकला. हा सामना ३ तास १७ मिनिटे चालला.गतविजेता स्पेनच्या कार्लोस अल्कारेझनेही तिसरी फेरी गाठली आहे. अल्कारेझने जागतिक क्रमवारीत ६९व्या स्थानावर असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या अलेक्झांडर वुकिकचा पराभव केला.नाओमी ओसाकाला बुधवारी दुसऱ्या फेरीत अमेरिकेच्या एम्मा नवारोने पराभूत केले. २०१८ नंतर तिची पहिली विम्बल्डन खेळणाऱ्या ओसाकाला सेंटर कोर्टवर पराभव पत्करावा लागला.

## टीम इंडियासोबत साधला प्रधानमंत्र्यांनी संवाद

# बीसीसीआयने मोदींना दिली 1 नंबरची जर्सी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आठ महिन्यांपूर्वी टीम इंडियाला वनडे वर्ल्डकप स्पर्धेत पराभवाचं तोंड पाहावं लागलं होतं. अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाने भारताला पराभूत केलं होतं. तेव्हा निराश झालेल्या भारतीय संघाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ड्रेसिंग रूममध्ये जाऊन भेट घेतली होती. तसेच दु:खात असलेल्या भारतीय संघाचं सांत्वन केलं होतं. आता चित्र बदललं आहे.

भारतीयसंघाने बारबाडोसमध्ये जाऊन भारताचा झेंडा रोवला




आहे. टीम इंडियाने १७ वर्षांनंतर टी २० वर्ल्डकप जेतेपदावर नाव कोरून मायदेशी परतली.

टीम इंडियाच्या कामगिरीचं सर्वत्र कौतुक होत आहे. असं असताना भारतीय संघाने दिल्लीत उतरल्या उतरल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी संपूर्ण संघासोबत जवळपास दीड तास चर्चा रंगली. या मुलाखतीचा व्हिडीओ समोर आला असून ट्रेंड होत आहे.

दरम्यान बीसीसीआयच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा खास सत्कार करण्यात आला. यावेळी नरेंद्र मोदी यांनी टीम इंडियाची जर्सी गिफ्ट देण्यात आली. त्यावर शॉर्टफॉर्म म्हणून नमो लिहिलं आहे. तसेच जर्सीचा क्रमांक १ दिला आहे.

विजयी भारतीय क्रिकेट संघाने आज आगमनानंतर भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांची त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. सर, तुमच्या प्रेरणादायी शब्दांबद्दल आणि संघाला तुम्ही दिलेल्या अमूल्य पाठिंब्याबद्दल आम्ही तुमचे मनापासून आभार मानतो. जय हिंद, असं ट्वीट बीसीसीआयने केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ट्वीट करत भेटीची माहिती दिली आहे. 'चॅम्पियन्ससोबत छान भेट झाली. ७, लोककल्याण मार्ग येथे विश्वचषक विजेत्या संघाचे स्वागत करण्यात आले. यादरम्यान संस्मरणीय गोष्टी घडल्या.', असं ट्वीट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. वानखेडेवर फ्री एन्ट्री असल्याने मैदान खचाखच भरणार यात शंका नाही. वानखेडे स्टेडियमवर विजेत्या संघाचा सत्कार असणार आहे. यावेळी बीसीसीआय विजेत्या संघाला १२५ कोटींची रक्कम देणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)